शनिवार, ४ जून २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक ३१७
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## कोरोना रुग्णवाढ : केंद्राचे राज्य सरकारला पत्र



**मुंबई :** महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून कोरोना रुग्णसंख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने राज्य सरकारला पत्र पाठवले असून याद्वारे कोरोनाला रोखण्यासंदर्भात महत्त्वाचे आदेश दिले आहेत. केंद्रीय आरोग्य सचिव राजेश भूषण यांनी राज्याचे आरोग्य सचिव प्रदीप व्यास यांना पत्र पाठवले आहे. राज्यातील सहा जिल्ह्यांमध्ये कोरोना रुग्णसंख्या वाढत असल्याचे या पत्रात नमूद करण्यात आले आहे. मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पुणे, रायगड आणि पालघर या जिल्ह्यांतील रुग्णसंख्या चिंताजनक असल्याचे केंद्राने म्हटले आहे. या जिल्ह्यांमध्ये चाचण्या आणि लसीकरण वाढवण्यावर भर देण्यात यावा, असे आदेश देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे नवीन कोरोना व्हेरिएंटवर लक्ष द्यावे, असेही निर्देश दिले गेले आहेत.


**अंतरंग**

अब तेरा क्या होगा कालिया? -सोमय्या/२

ज्येष्ठ नागरिकांचा कुटुंबवत्सल सन्मान/३

वावोशी परिसरात मातीचे बेकायदा उत्खनन/७


# पनवेल नावाजलेली महापालिका होणार

## ■ विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास; विविध विकासकामांचे भूमिपूजन, लोकार्पण



(छाया : लक्ष्मण ठाकूर) अधिक छायाचित्रे पान ८ वर..

**पनवेल : प्रतिनिधी**

**पनवेल परिसराचा वेगाने विस्तार होत आहे. या परिसरात आंतरराष्ट्रीय विमानतळ, न्हावा-शिवडी सी लिंक यांसारखे प्रकल्प उभे राहत आहेत. त्यामुळे पनवेल ही तिसरी मुंबई होणार असून येथील महापालिका नावाजलेली महापालिका होईल, असा विश्वास माजी मुख्यमंत्री तथा विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि. ३) येथे व्यक्त केला. ते पनवेल महापालिका आयोजित विविध विकासकामांचे भूमिपूजन आणि लोकार्पण सोहळ्यात बोलत होते.**

या सोहळ्यास खासदार सुनील तटकरे व श्रीरंग बारणे, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी मंत्री व विद्यमान आमदार रवींद्र चव्हाण, माजी मंत्री व विद्यमान आमदार रविशेठ पाटील, माजी मंत्री राम शिंदे, भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार निरंजन डावखरे, महापौर डॉ. कविता चौतमोल, उपमहापौर सीताताई पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील, आयुक्त गणेश देशमुख, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, शहराध्यक्ष जयंत पगडे तसेच सभापती,



नगरसेवक-नगरसेविका, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

आपल्या भाषणाच्या सुरुवातीला विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी लोकनेते दिवंगत गोपीनाथ मुंडे यांना आठव्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन केले, तर रायगडचे लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांना जन्मदिनाच्या शुभेच्छा दिल्या. ते पुढे म्हणाले की, आज या ठिकाणी विविध कामांचे भूमिपूजन, लोकार्पण आपण केले याचा अतिशय आनंद होत आहे. याचे श्रेय आमदार प्रशांत ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल, आयुक्त व त्यांच्या सहकाऱ्यांना जाते. पनवेल हे वाढते शहर असून येथील गरजा पूर्ण करण्यासाठी नगर परिषदेची महापालिका झाली पाहिजे, अशी आग्रही मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली होती. त्यानुसार २०१६ साली आपण या महापालिकेची निर्मिती केली.

या वेळी खासदार सुनील तटकरे यांनी आपल्या भाषणात देवेंद्र फडणवीस उत्तम मुख्यमंत्री होते यात दुमत नाही, असे गौरवोद्गार काढले. इतर मान्यवरांचीही समयोचित भाषणे झाली.

**(सविस्तर वृत्त उद्याच्या अंकात)**

### देवेंद्र फडणवीस उत्तम मुख्यमंत्री होते यात दुमत नाही -खासदार सुनील तटकरे

### या विकासकामांचे लोकार्पण

१) पनवेल येथील अंतिम भूखंड क्र. १२५मधील सुशोभीकरण केलेला वडाळे तलाव. २) पनवेल येथील अंतिम भूखंड क्र. १२७ 'अ'मधील प्राथमिक मराठी कन्याशाळेची इमारत. ३) प्रभाग क्र. १३मधील सुशोभीकरण केलेला जुई गावामधील तलाव. ४) अमृत अभियान अंतर्गत पाणीपुरवठा योजनेतून पनवेल येथील मार्केट यार्ड, तक्का रोड, इच्छापूर्ती गणेश मंदिर, हरीओम नगर, एचओसी कॉलनीजवळील उभारलेला उंच जलकुंभ.

### या विकासकामांचे भूमिपूजन

१) प्रभाग क्रमांक १४ मधील भूखंड क्र. ४, से.१६, नवीन पनवेल येथे पनवेल महापालिका मुख्य प्रशासकीय इमारत-'स्वराज्य'चे बांधकाम करणे. २) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत महाकाली नगर, वाल्मिकी नगर, टपाल नाका, लक्ष्मी वसाहत येथील झोपडपट्टीचा पुनर्विकास करून घरे बांधणे. ३) प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत पटेल मोहल्ला व कच्छी मोहल्ला येथील झोपडपट्टीचा पुनर्विकास करून घरे बांधणे. ४) प्रभाग १६मधील भूखंड क्र. २८, से. ११, नवीन पनवेल येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र (अकॅडमी) विकसित करणे. ५) प्रभाग ४मधील भूखंड क्र. १५१, से. २१ खारघर येथे महापौर निवासस्थान-'शिवनेरी'चे बांधकाम करणे. ६) प्रभाग ७मधील भूखंड क्र. ५, ६, ७ व ८, से. ८ई कळंबोली येथे प्रभाग कार्यालय-'विजयदुर्ग'चे बांधकाम करणे. ७) भूखंड क्र. १३, काळुंद्रे येथे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र बांधणे. ८) प्रभाग १३मधील जुई गावामध्ये मल:निस्सारण वाहिन्या टाकणे, पम्पिंग स्टेशन बांधणे व मल:प्रक्रिया केंद्र उभारणे.



**पनवेल : मावळ लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त शुक्रवारी शुभेच्छा दिल्या.**

राज्यसभा निवडणूक

## महाराष्ट्रात होणार लढत

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातून कुणीही माघार न घेतल्याने बिनविरोध निवडणूक होण्याची शक्यता संपुष्टात आली आहे. त्यामुळे आता १० जून रोजी सहाव्या जागेसाठी धनंजय महाडिक (भाजप) आणि संजय पवार (शिवसेना) यांच्यात लढत आहे.

राज्यसभा निवडणुकीसाठी अर्ज माघारी घेण्याची शुक्रवारी दुपारी ३ वाजेपर्यंतची अंतिम मुदत होती. तत्पूर्वी महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ, शिवसेनेचे नेते खासदार अनिल देसाई, काँग्रेस नेते सुनील केदार यांनी विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटीलदेखील उपस्थित होते. या बैठकीत तोडगा निघू शकला नाही. त्यामुळे आता निवडणूक अटळ झाली आहे.

### उलवे नोडमध्ये उद्या भव्य सायक्लोथॉन

## ७००हून अधिक स्पर्धकांची नोंदणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्वसामान्यांचा आधारवड असलेले माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा ७१वा वाढदिवस आणि जागतिक पर्यावरण दिनानिमित्त रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, उलवे सेना सामाजिक संस्था व सायकलिस्ट क्लब ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या रविवारी (दि. ५) सकाळी ६ वाजता उलवे नोडमध्ये भव्य उलवे सायक्लोथॉन स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शुक्रवारपर्यंत ७००हून अधिक स्पर्धकांनी नोंदणी केलीय.

सायकल चालविण्याचे अनेक फायदे आहेत. त्या अनुषंगाने सायकल संस्कृती वाढावी व सायकलबद्दल आवड निर्माण व्हावी या हेतूने या स्पर्धेचे आयोजन उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल


**लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा वाढदिवस आणि जागतिक पर्यावरण दिनानिमित्त स्पर्धा**



स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे करण्यात आले आहे. ही स्पर्धा महिला व पुरुष प्रकारात आणि २५ किमी, १५ किमी, १० किमी व तीन किमी अंतर अशा चार गटांत होणार असून विजेत्यांना भरघोस पारितोषिकांनी गौरविण्यात येणार आहे. विशेष आकर्षण असलेल्या २५ किमी अंतराच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्यास २० हजार रुपये, द्वितीय क्रमांकास १० हजार रुपये, तृतीय क्रमांकास पाच हजार रुपये, चतुर्थ व पाचव्या क्रमांकास अनुक्रमे तीन हजार आणि दोन हजार रुपये तसेच पाच उत्तेजनार्थ बक्षिसे आहेत. त्याचप्रमाणे स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या स्पर्धकास टी-शर्ट व मेडल देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.


स्पर्धकांच्या सुरक्षेची काळजी घेण्यासाठी वैद्यकीय पथकाची व्यवस्था करण्यात आली आहे तसेच या ठिकाणी झुम्बा मनोरंजनाचा लाभ प्रेक्षक व स्पर्धकांना घेता येणार आहे. याशिवाय तीन ते सहा वर्षांपर्यंतच्या लहान मुलांसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेच्या अनुषंगाने सोसायट्यांसाठी विशेष स्पर्धाही होणार आहेत. यामध्ये स्वच्छ सोसायटी, स्पर्धेत सर्वांत जास्त सहभाग आणि ग्रीन सोसायटी यांचा समावेश आहे. या स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकास अनुक्रमे १० हजार, तीन हजार व दोन हजार रुपये असे बक्षीस असणार आहे.

स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे ऑफलाईन, तर www.rtisc.in या संकेतस्थळावर ऑनलाइन स्वरूपात नोंदणी करता येणार आहे. अधिक माहितीसाठी ९०२९०६५५३३ किंवा ९८२०१९८३८१ या क्रमांकावर संपर्क साधावा.



# अब तेरा क्या होगा कालिया?

## ■ सचिन वाझे माफीचा साक्षीदार झाल्यानंतर किरीट सोमय्यांचा निशाणा



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावरील भ्रष्टाचाराच्या आरोपप्रकरणी बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझे यांना माफीचा साक्षीदार होण्यास विशेष न्यायालयाने बुधवारी परवानगी दिली. या पार्श्वभूमीवर भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी महाविकास आघाडी सरकारमधील परिवहनमंत्री तथा शिवसेना नेते अनिल परब आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे.

'मला हिंदी सिनेमाचा डायलॉग आठवतो अब तेरा क्या होगा कालिया? अनिल परब यांना झोप येत नसेल आणि उद्धव ठाकरेंचीही झोप उडाली असेल. उद्धव ठाकरेंनी बेकायदेशीरपणे सचिन वाझेची नियुक्ती केली होती. सचिन वाझेकडून आलेला १०० कोटींच्या वसुलीचा पैसा अनिल परब यांच्या रिसॉर्टमध्ये गुंतविण्यात आला होता. अनिल देशमुख गेले आता अनिल परब आणि उद्धव ठाकरे तुमचे काय होणार? असे किरीट सोमय्या यांनी म्हटले आहे.

महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाने विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीसांची भेट घेतल्यासंबंधी बोलताना किरीट सोमय्या म्हणाले की, उद्धव ठाकरेंना इतकी भीती का वाटते? स्वतःच्या पक्षाचे आणि मित्रपक्षाचे आमदार विकले जाऊ शकतात असा आरोप संजय राऊत करीत आहेत. बेईमान कोण आहे हे जनतेला चांगलेच माहित असेही ते म्हणाले.





**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून महापालिकेच्या माजी महिला व बालकल्याण सभापती तथा विद्यमान नगरसेविका मोनिका महानवर व नवीन पनवेल एचडीएफसी बँकेच्या मॅनेजर नीधी बांयजल यांनी गुरुवारी त्यांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी नम्रता नाईक उपस्थित होत्या.**

# पनवेल परिसरात दागिने लुटमारीच्या घटनांमध्ये वाढ

## ■ विविध ठिकाणी लाखोंचा ऐवज लंपास

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरातील कामोठे व खारघर या भागात दागिने लुटमारीच्या घटनांमध्ये वाढ झाली असून लाखो रुपये किमतीचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला आहे.

कामोठे येथे सायन-पनवेल महामार्गावर पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास रत्नागिरी येथून एसटीने कुटुंबासह उतरलेल्या रत्नमाला जाधव(६२)यांच्या अंगावरील तब्बल सहा तोळे वजनाचे तीन लाख रुपये किंमतीचे दागिने दोघा लुटारुंनी लुटून पलायन केले. रत्नमाला यांच्या मुलाने लुटारुंना पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र, हा लुटारु त्याच्या हाती लागले नाहीत. कामोठे, सेक्टर १९मध्ये घडलेल्या घटनेत मैत्रिणीसह फेरफटका मारण्यासाठी सेक्टर २५मध्ये गेलेल्या मीनल सारंग (६२) यांच्या गळ्यातील ६६ हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र एका लुटारुने खेचून जेएनपीए हायवेच्या दिशेने पलायन केले. खारघर सेक्टर ३४ बीमध्येसुद्धा दोघा लुटारुंनी मॉर्निंग वॉकसाठी पेठपाडा मेट्रो स्टेशनच्या खाली गेलेल्या नजमा तबरेज जमेदार (३५) या विवाहितेच्या गळ्यातील ४० हजार रुपये किंमतीची सोन्याची चेन खेचून पलायन केले. त्यानंतर रात्रीच्या सुमारास मैत्रिणीसह सीबीडी, सेक्टर पाच भागात गेलेल्या सरला देशमुख (५७) यांच्या गळ्यावर फटका मारुन त्यांच्या गळ्यातील एक लाख रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र आणि सोन्याची चेन खेचून खारघरच्या दिशेने पलायन केले.

उलवे, सेक्टर १७ येथे राहणारे मोहम्मद फाजिल टीपी यांनी घरकाम करण्यासाठी रियाज मुसा (४४ रा. केरळ) ठेवले होते. दीड वर्षापासून तो त्यांच्याकडे काम करतो. मोहम्मद व त्याच्या आई-वडिलांना केरळला जायचे असल्याने वडिलांनी रियाजला उलवे येथे येण्यास सांगितले. त्यानंतर मोहम्मद व आई-वडील हे मूळगावी केरळ येथे गेले. जाताना घराची एक चावी वॉचमनला दिली. त्यानंतर वडिलांनी रियाजला कॉल केला असता त्याने उलवे येथे आला असल्याचे सांगितले. त्यानंतर चार ते पाच दिवसांनी रियाजचा मोबाईल नंबर बंद लागत असल्याने त्याच्या सोबत संपर्क होऊ शकला नाही. उलवे येथे मोहम्मद व आई वडील आले असता रियाज घरी नव्हता तसेच त्यांना घरात लॅपटॉप मिळून आला नाही व त्याचा मोबाइल बंद असल्याने घरातील वस्तू व पैसे पाहिले असता मोबाईल, लॅपटॉप, अंगठ्या, ॲक्सिस बँकेचे चेकबूक सापडले नाही. त्यामुळे रियाजच्या विरोधात तीन लाख सहा हजार रुपयांचा ऐवज चोरी केली असल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला.

सर्व गुन्ह्यांची पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. या वाढत्या गुन्हेगारीमुळे ज्येष्ठ नागरिकांसह सर्वांमध्ये भीतीयुक्त वातावरण पसरले आहे.

आमदार मंदाताई म्हात्रे, नवी मुंबई पालिका यांच्या संयुक्त विद्यमाने

# पामबीच मार्गावर पुन्हा साजरा होणार हॅप्पी स्ट्रीट कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदाताई म्हात्रे व नवी मुंबई महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार ५ व १२ जून २०२२ रोजी सकाळी ६ ते ८.३० वाजता नेरूळ पामबीच आगरी कोळी भवन सिग्नल ते टी.एस.चाणक्य करावे येथील सिग्नल दरम्यानच्या मार्गावर हॅप्पी स्ट्रीट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

तणावमुक्त वातावरण निर्माण व्हावे यासाठी कार्यक्रमात झुम्बा डान्स, योग वर्ग, सायकलिंग, स्केटिंग, चित्रकला, हस्तकला, टॅटू कला अशा विविध प्रकारच्या करमणुकीचे कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत. नवी मुंबईतील ज्येष्ठ नागरिक, महिला वर्ग, विद्यार्थी, लहान मुलांनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन आमदार मंदाताई म्हात्रे यांनी केले आहे.

यावेळी आमदार मंदाताई म्हात्रे यांनी सांगितले की, नवी मुंबईतील ज्येष्ठ नागरिक, महिलावर्ग, विद्यार्थी, लहान मुले यांना विरंगुळा म्हणून प्रत्येक रविवारी सकाळी ६ ते ९ वाजेपर्यंत हॅप्पी स्ट्रीट कार्यक्रम होत होते. याकरिता झुम्बा डान्स, योगा, सायकलिंग, स्केटिंग, चित्रकला, हस्तकला, टॅटू कला अशा विविध प्रकारच्या करमणुकीचे कार्यक्रम आयोजित केले जातात. परंतु कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गेली २ वर्षे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले नाही. सद्यस्थितीत कोरोना आटोक्यात आल्याने हा कार्यक्रम पुन्हा सुरु करण्यास काहीही हरकत नसल्याने शासनाचे सर्व नियम पाळून तसेच शासनाच्या सर्व परवानग्या घेऊन नवी मुंबई महानगरपालिका यांच्या विद्यमाने हॅप्पी स्ट्रीट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. गेल्या ३ वर्षापासून नवी मुंबईतील स्थानिक नागरिक या कार्यक्रमाची आतुरतेने वाट पाहत असून या कार्यक्रमामुळे त्यांच्यामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. नवी मुंबई महानगरपालिकेनेही सहभाग घेतला असून महापालिकेच्या योजनांची माहिती या कार्यक्रमाच्या माध्यमातून शक्य होणार आहे.





**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त शहरातील उरण नाक्याजवळ सांस्कृतिक कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या वेळी नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, कोळीवाडा अध्यक्ष हरिश्चंद्र कोळी, अर्चना परेश ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.**

# उद्योजक अभिजित पाटील मल्टीटास्किंग बिझनेस पर्सन ईन महाराष्ट्र २०२२ पुरस्काराने सन्मानित

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध उद्योजक अभिजित पाटील यांना आज नाशिक येथे 'मल्टीटास्किंग बिझनेस पर्सन ईन महाराष्ट्र २०२२' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. 'महाराष्ट्र बिझनेस आयकॉन अवॉर्ड्स २०२२' या भव्यदिव्य कार्यक्रमात सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री तेजस्विनी पंडित यांच्या हस्ते उद्योजक अभिजित पाटील यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.



'महाराष्ट्राचा अभिमान उद्योजकांचा सन्मान' या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन नाशिक येथे करण्यात आले होते. याप्रसंगी महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील उद्योग समूहाचे संचालक, मालक, भागीदार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

रायगड च्या पनवेल तालुक्यातील आपटा या छोट्याशा गावातून २३ वर्षांपूर्वी उद्योगाची सुरुवात केलेल्या अभिजित पाटील यांचा केलेला सन्मान म्हणजे समस्त रायगड आणि नवी मुंबईवासीयांचा सन्मान असल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत. अभिजित पाटील यांना मिळालेल्या सन्मानामुळे त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा व कौतुकाचा वर्षाव होत आहे. तसेच त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छाही दिल्या जात आहेत.

# आता स्टेशन चुकणार नाही! रेल्वेकडून प्रवाशांसाठी खास सेवा

**मुंबई : प्रतिनिधी**

रेल्वेचा प्रवास सोपा आणि सोयीस्कर मानला जातो. त्यातच भारतीय रेल्वे प्रवाशांना सतत वेगवेगळ्या सेवा उपलब्ध करून देत असून त्यात नवीन अपडेट करत आहे. दरम्यान, रेल्वेने प्रवाशांसाठी मोठी सेवा सुरू केली आहे. या सेवेमुळे तुम्ही स्टेशन चुकण्याची चिंता न करता ट्रेनमध्ये आरामात झोपू शकता. रेल्वे तुम्हाला स्टेशनवर येण्याच्या २० मिनिटे आधी उठवेल. यामुळे तुमचे स्टेशन चुकणार नाही आणि तुम्ही झोपदेखील पूर्ण करू शकाल.

रेल्वेच्या या विशेष सेवेचे नाव 'डेस्टिनेशन अलर्ट वेकअप अलार्म' असे आहे. ट्रेनने प्रवास करतेवेळी अनेकांना झोप येते आणि यामुळे त्यांचे स्टेशन चुकते. हा प्रकार सहसा रात्रीच्या प्रवासादरम्यान होतो. या समस्येवर मात करण्यासाठी ही सुविधा रेल्वेकडून सुरू करण्यात आली आहे. रेल्वेने १३९ क्रमांकाच्या चौकशी सेवेवर ही सुविधा सुरू केली आहे. ट्रेनमध्ये प्रवास करणारे प्रवासी चौकशी प्रणाली क्रमांक १३९ वर अलर्ट सुविधा मागू शकतात.

ट्रेनमधील प्रत्येक प्रवासी या विशेष सेवेचा लाभ घेऊ शकतो. रात्री ११ ते सकाळी ७ या वेळेत प्रवाशांना ही सुविधा उपलब्ध असेल. या सेवेसाठी रेल्वेकडून केवळ तीन रुपये शुल्क निश्चित करण्यात आले आहे. ही सेवा घेतल्यास, स्टेशनच्या २० मिनिटे आधी तुमच्या फोनवर अलर्ट पाठवला जाईल. जेणेकरून तुम्ही व्यवस्थित उतरू शकता.

# नवी मुंबईकरांनी घेतली तंबाखूमुक्तीची शपथ

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्ताने नवी मुंबई महानगरपालिकेचा परिमंडळ १ विभाग, समाजविकास विभाग, बेलापूर विभाग कार्यालय आणि नशाबंदी मंडळ, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने सेक्टर ११, सीबीडी बेलापूर येथील बेलापूर भवन या ठिकाणी व्यसनमुक्ती प्रचार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या वेळी बेलापूर विभागाच्या सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी मिताली संचेती यांच्या हस्ते व्यसनमुक्ती पोस्टर्स प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. मनोगत व्यक्त करताना मिताली संचेती यांनी जागतिक तंबाखू विरोधी दिनाचे महत्त्व विषद केले. तंबाखूचे व्यसन आत्ताच थांबविले नाही, तर सन २०३०पर्यंत जगातील सुमारे १०० कोटी लोक तंबाखूपासून होणाऱ्या रोगांमुळे मृत्यू पावतील असा जागतिक आरोग्य संघटनेने इशारा दिला असल्याचे सांगत संचेती यांनी त्यामध्ये २० ते ३० वर्षे वयोगटातील ४० टक्के लोक असू शकतात, अशी माहिती दिली. उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली. येणाऱ्या वर्षात शाळा, महाविद्यालये, हॉस्पिटल्स, धार्मिक स्थळे यांच्यापासून १०० मीटर अंतरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ विक्री बंद व्हावी याबाबत जनजागृती कायदा अंमलबजावणीची मोहीम राबविण्यात येईल, अशी माहिती नशाबंदी मंडळाच्या वतीने देण्यात आली.

या कार्यक्रमात अन्वय व्यसनमुक्ती केंद्र, प्रजापिता ब्रह्मकुमारी या सेवाभावी कार्य करणाऱ्या संस्थांनी सहभागी होत पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करून व्यसनमुक्तीचा संदेश प्रसारित केला. तंबाखूजन्य कायद्याची माहिती दर्शविणारे कटआऊट, प्रदर्शनी, पोस्टर्स, पत्रके अशा माध्यमातून तंबाखूजन्य पदार्थ व विक्री कायदा २००३चा प्रचार, प्रसार व अंमलबजावणीसाठी आयोजित या कार्यक्रमात उपस्थित सर्वांनी आपला सहभाग नोंदवत तंबाखूजन्य पदार्थपासून दूर राहण्याचा संकल्प केला.



# गव्हाण विद्यालयात उन्हाळी वर्ग तासिका सुरू

**गव्हाण : वार्ताहर**


येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये इयत्ता १०वी आणि १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी वर्ग तासिका सुरू झाल्या असून या उन्हाळी वर्ग तासिकांचे उद्घाटन विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन आणि रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी व समन्वय समिती सदस्य अरूणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.

या वेळी उद्घाटनपर भाषणात अरूणशेठ भगत यांनी विद्यार्थ्यांनी शिस्तप्रिय वर्तनाने तसेच जिद्द आणि चिकाटीने अभ्यास करुन उज्ज्वल यश संपादन करावे असे आवाहन केले. या कार्यक्रमास विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, शाळेच्या प्राचार्या साधना डोईफोडे, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी आणि रवींद्र भोईर तसेच लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, पर्यवेक्षक दीपक भर्णुके, जुनियर कॉलेज विभाग प्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे, वर्गशिक्षक चित्रा पाटील, सागर रंधवे व संदीप भोईर, प्रा. माणिकराव घरत, प्रा. उमेश पाटील तसेच वृषाली म्हात्रे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सागर रंधवे यांनी केले.





**पनवेल : महापालिका प्रभाग क्रमांक १७मध्ये पावसाळ्यापूर्वीच्या नालेसफाई व वृक्षछाटणीच्या कामांना प्रारंभ करण्यात आला आहे. त्याची पाहणी सभापती ॲड. वृषाली वाघमारे यांनी शुक्रवारी केली. प्रभाग क्रमांक १७मध्ये नालेसफाईला श्रेयश हॉस्पिटलपासून प्रारंभ करण्यात आला.**

पनवेल भाजपतर्फे

जनहितार्थ

माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत

शनिवार, दि. ४ जून २०२२ रोजी होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स

सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

■ १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल ■ २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल

■ ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली

■ ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर

■ ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर

■ ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली

■ ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.

# ज्येष्ठ नागरिकांचा कुटुंबवत्सल सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोणत्याही क्षेत्रात ज्येष्ठांच्या अनुभवी मार्गदर्शनाशिवाय यशस्वी वाटचाल करणे शक्य नाही. त्यांच्या अनुभवाची शिदोरी समाजाला दिशा देणारी आहे. त्यामुळे ज्येष्ठांचा सन्मान व त्यांच्याप्रती आदर व्यक्त करीत गुरुवारी (दि. २) सायंकाळी न्हावाखाडी येथे उत्तर रायगड जिल्हा भाजप व श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांचा हृद्य सत्कार करण्यात आला. निमित्त होते ते समाजसेवेचा अथांग सागर, दानशूर व्यक्तिमत्त्व आणि सर्वसामान्यांचे आधारवड असेलेले माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा ७१वा वाढदिवस. भव्य शामियानात झालेल्या या सोहळ्याने ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार समाजाला ऊर्जा देणारा ठरला.

या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभलेले माजी मंत्री विद्यमान आमदार गणेश नाईक, माजी मंत्री विद्यमान आमदार रवीशेठ पाटील, माजी मंत्री जगन्नाथ पाटील, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, आमदार महेश बालदी, लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय संघर्ष समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कार्याचा गौरव या सोहळ्यात केला.

गरिबीतून मोठे झालेले लोकनेते रामशेठ ठाकूर कधीच गरिबांना विसरले नाहीत. त्याचबरोबरीने समाजसेवेचा अखंड यज्ञ सुरूच असल्याचे गौरवोद्गार त्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अभीष्टचिंतन करताना मनोभावे व्यक्त केले. या वेळी या उपस्थित मान्यवरांनी लोकनेते रामशेठ ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर यांचे भव्य पुष्पाहार देऊन अभीष्टचिंतन केले. व्यासपीठावर भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, सभागृह नेते परेश ठाकूर, स्व. दि. बा. पाटील यांचे चिरंजीव अतुल पाटील, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, सामाजिक कार्यकर्ते दशरथ भगत, भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष जयंत पगडे उपस्थित होते.

महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक इतिहासात ज्या थोर व महनीय व्यक्तींनी आपल्या कर्तृत्वाने नवी दिशा दिली, त्या व्यक्तींमध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नाव फार महत्त्वाचे आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून सामाजिक, राजकीय, शैक्षणिक तसेच औद्योगिक क्षेत्रात स्वकर्तृत्वाने त्यांनी आपले वेगळे स्थान निर्माण केले. आजही ते तळागाळात मदत करीत असतात, म्हणून त्यांची दानशूर कीर्ती देशभर आहे आणि त्यांचा माणसावर जास्त विश्वास आहे. त्यामुळे त्यांच्या वाढदिवसानिमित्त न्हावाखाडी येथे ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार समारंभ, लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा अभीष्टचिंतन सोहळा, आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून उलवा नोडसाठी देण्यात आलेल्या रुग्णवाहिका व शववाहिकेचे लोकार्पण, तसेच महाराष्ट्र शिरोमणी लोकशाहीर विठ्ठल उमप थिएटर प्रस्तुत व नंदेश उमप निर्मित लोककलांतून महाराष्ट्राच्या वैभवशाली संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या मी मराठी हा सांस्कृतिक कार्यक्रम झाला.

ज्येष्ठ नागरिक हे कुटुंब आणि समाजाला नेहमीच मार्गदर्शक आणि हितचिंतक राहिलेले असतात. त्यामुळे सामाजिक भावना लक्षात घेत ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान या सोहळ्यात होत असताना कुटुंबवत्सल वातावरण अधोरेखित होत होते. आजपर्यंत लाखांहून अधिक ज्येष्ठ नागरिकांचा त्यांनी सत्कार करून ज्येष्ठ नागरिकांप्रती आदर सन्मान केला आहे. त्या अनुषंगाने ही परंपरा कायम ठेवत लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला.

या वेळी आमदार महेश बालदी यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, लोकनेते यांचा वाढदिवस म्हणजे स्फूर्ती व ऊर्जा देणारा दिवस आणि त्याचे औचित्य साधून या समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. लोकनेते रामशेठ ठाकूर या गावात जन्मले. मीही या गावात जन्मलो, खेळलो वावरलो. त्या गावात मला चांगले काम करता आले पाहिजे ही भावना ठेवून ते काम करीत आहेत. या परिसरात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रामबाग उभारली आहे. महाराष्ट्रात अनेक नेते झाले, पण आपल्या गावाठिकाणी असे नंदनवन फुलवले नसेल. त्यामुळे हा परिसर आवर्जून पहा, असे आवाहन त्यांनी या वेळी केले.

ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी सांगितले की, पत्रकारितेच्या ६२ वर्षांत मी खूप मोठ्या माणसांत वावरलो, पण माझ्या मनात मोजकी माणसे वसलेली आहेत, त्यामध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर हे असून असा माणूस कदापिही होणे नाही. समाजासाठी कणन् कण देणारे ते व्यक्ती आहेत, त्यामुळे त्यांच्यासारखा पुन्हा माणूस घडणार नाही. महाराष्ट्रात अनेक नेते झाले पण रयत शिक्षण संस्थेला सात कोटी रुपयांची इमारत देणारे ते एकमेव व्यक्ती आहेत. विलासराव देशमुख नेहमी बोलायचे प्रत्येक जिल्ह्यात रामशेठ ठाकूर निर्माण झाले पाहिजे. समाजाची विचारधारा असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सामाजिक जीवनात काम करताना कधीही पक्ष बघितला नाही, त्यामुळे त्यांना सर्व पक्षात आदराचे स्थान आहे. त्यामुळे महाराष्ट्रचा इतिहास लोकनेते रामशेठ ठाकूर यांना वगळून लिहू शकत नाही, असेही मधुकर भावे यांनी अधोरेखित केले.

या सन्मानाला उत्तर देताना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले की, आजच्या अभीष्टचिंतन सोहळ्यानिमित्त ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान, रुग्णवाहिकेचे लोकार्पण अशा समारंभासाठी उपस्थित असलेल्या सर्वांचे मी आभार मानतो. हा कार्यक्रम माझ्या जन्मगावीच होत असल्याचा मला जास्त आनंद आहे. नवी मुंबईचे आमदार गणेश नाईक यांचे चिरंजीव संजीव नाईक, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, परेश ठाकूर ही पिढी आज सक्षमपणे विकासाची कामे करीत आहे, हे बघून समाधान वाटते. मी लहान असतानाचे न्हावाखाडी आणि आता विकास झालेले न्हावाखाडी यात खूप फरक आहे आणि हा फरक मला करता आला, याबद्दल कृतार्थ झाल्यासारखे वाटत आहे.

या सोहळ्यात पंचक्रोशीच्यावतीने न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच हरेश्वर म्हात्रे, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, चिंतामण भोईर, विजय घरत, सागर ठाकूर यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अभीष्टचिंतन केले. या सोहळ्यास सामाजिक, शैक्षणिक, कला, राजकीय, कामगार, क्रीडा आदी क्षेत्रातील मान्यवर आणि हजारोंच्या संख्येने नागरिक उपस्थित होते.






**गरिबीतून मोठे झालेले लोकनेते रामशेठ ठाकूर गरिबांना विसरले नाहीत** –आमदार गणेश नाईक

*गरिबांच्या वेदना लोकनेते रामशेठ ठाकूर यांना माहित आहेत, त्यामुळे ते गरिबाला कधीही विसरले नाहीत. १९९६–९७ साली आम्हा दोघांचा परिचय झाला. संजीव नाईक यांचे ते शिक्षक होते, त्यामुळे रामशेठ आणि संजीव यांच्यात गुरु–शिष्याचे नाते आहे. रामशेठ यांना अनेक आमिषे आली पण ते तत्त्व पाळणारे आहेत, त्यामुळे ते कधीही त्या आमिषांना बळी पडले नाहीत. रामशेठ यांचे पुत्र आमदार प्रशांत ठाकूर, परेश ठाकूर विनम्र व सजग असे आहेत, तेसुद्धा त्यांच्या पाऊलांवर पाऊल ठेवून समाजाच्या उत्कर्षाचे काम करीत आहेत. कोणतेही कार्य करताना ते जात– धर्म– पंथ बघत नाहीत. म्हणूनच लोकांच्या मनात त्यांच्याविषयी आदराचे स्थान आहे, तसेच रामशेठ यांचा सन्मान म्हणजेच समाजाचा सन्मान आहे. जुन्या आठवणींचा वेध घेताना त्यांनी सांगितले की, मी शिवसेनेमध्ये असताना दि. बा. पाटील साहेब शेकापमध्ये होते आणि त्यावेळी रायगडमध्ये शिवसेना रुजावी ही शेकापची धारणा नव्हती. त्यामुळे दि. बा. पाटील आणि माझ्यामध्ये थोडेबहुत मतभेद झाले होते, मात्र आता नवी मुंबई विमानतळाला दिबांचे नाव देताना अनेकदा मी नसल्याचा उल्लेख होतो. संजीव नाईक या लढ्यात आहे, याचा अर्थ मीसुद्धा या लढ्यात आहे, ज्यावेळी रस्त्यावर उतरण्याची वेळ येईल त्यावेळी या लढ्यात ताकदीनिशी उतरीन.*

**खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे, असे लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्याकडे दानशूरपणा आहेच पण त्या बरोबरीने लोकांच्या सुखदुःखात धावून जाणारे ते नेते आहेत. प्रेमाने लोकांची मने जिंकणारे ते आहेत. कंदिलाला असलेल्या काचेचे महत्त्व नसते, तर त्यात असलेली ज्योत महत्त्वाची असते. त्याप्रमाणे लोकनेते रामशेठ ठाकूर समाजाची ज्योत असून त्याचा प्रकाश संपूर्ण रायगडमध्ये पसरला आहे.**
**–दशरथ पाटील, अध्यक्ष, लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय संघर्ष समिती**

**रामशेठ ठाकूर खऱ्या अर्थाने सर्व क्षेत्रात यशस्वी आहेत. दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई विमानतळाला देण्यासाठी आपल्या सर्वांचे प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी रामशेठ ठाकूर यांनी दिलेले योगदान महत्त्वाचे आणि अतुलनीय आहे. रामशेठ यांना नाही म्हणता येत नाही.**
**–जगन्नाथ पाटील, माजी मंत्री**

**...आणि समाजमंदिर उभे राहिले** –आमदार रविशेठ पाटील

*लोकनेते रामशेठ ठाकूर आणि त्यांच्या पत्नी शकुंतला ठाकूर यांना संपत्तीचा, मोठेपणाचा गर्व नाही. न्हावाखाडी गावात लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या रूपाने हिऱ्याने जन्म घेतला आणि त्यांनी आपल्या अफाट कार्यातून सर्व समाजाला आधार दिला. समाजासाठी देणारी लोकं फार कमी असतात, पण रामशेठ ठाकूर त्याला अपवाद ठरले. आपल्याकडे आहे ते सढळ हस्ते देण्याचा प्रयत्न त्यांचा असतो. १९९० सालापूर्वीची गोष्ट आहे, त्यावेळी पेण परिसरात समाजमंदिर उभारण्याचा समाजातील लोकांचा प्रयत्न होता, मात्र त्यावेळी पैसा गोळा होत नव्हता, मदत जमा करण्याचा प्रयत्न सुरू झाला आणि एक दिवस रामशेठ ठाकूर यांची भेट घेतली. पाच पंचवीस हजार मदतीच्या आशेने शब्द टाकला, मात्र रामशेठ यांनी त्यावेळी तब्बल तीन लाख रुपयांची देणगी दिली. ३२ वर्षांपूर्वी रामशेठ ठाकूर यांनी ती देणगी दिली नसती तो समजांदिर उभे राहिले नसते.*

## खांदा कॉलनी भाजप महिला मोर्चातर्फे खाऊवाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त गुरुवारी (दि. २) खांदा कॉलनी भाजप महिला मोर्चा यांच्यातर्फे सुकर्मा चॅरिटेबल ट्रस्टमधील मुलांना मोफत खाऊवाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे नियोजन अध्यक्ष राखी पिंपळे यांच्या नेतृत्वखाली करण्यात आले.

कार्यक्रमास भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली, तसेच भाजपच्या तालुका महिला मोर्चा अध्यक्षा तथा पं. स. सदस्या रतत्नप्रभा घरत, उपमहापौर सीताताई पाटील, नगरसेवक एकनाथ गायकवाड, शहर महिला मोर्चा सरचिटणीस नीता माळी, शहर चिटणीस मनीषा चिल्ले, शहर भ. वि. आ. अध्यक्ष गोपीनाथ मुंडे, प्रेमा भोपी, खांदा कॉलनी महिला मोर्चा उपाध्यक्षा सानिका इंदुलकर, मनीषा पाटील, सरचिटणीस आशा मुंडे, सचिव संध्या जाधव, सभासद सोनाली भाऊसाहेब सावंत, सीमा निकम, विनोदा शेट्टी, माजी नगरसेविका नीता माळी, मनीषा चिल्ले आदी उपस्थित होते.





## खांदा कॉलनीतील ज्येष्ठ नागरिकांना छत्रीचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपण समाजाचे काहीतरी देण लातो या भावनेतून नेहमीच मदतकार्य करणारे रायगड जिल्ह्यातील दानशून व्यक्तिमत्त्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त अनेक सेवाभावी उपक्रम राबविण्यात आले. त्या अंतर्गत खांदा कॉलनीमधील श्रीकृपा हॉलमध्ये ज्येष्ठ नागरिकांना मोफत छत्रीचे वाटप भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी (दि. २) करण्यात आले.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि नगरसेवक एनकाथ गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त आणि स्व. संजय भोपी यांच्या जयंत्तीनिमित्त भारतीय जनता पक्षातर्फे खांदा कॉलनीमध्ये ज्येष्ठ नागरिकांना छत्रीवाटप करण्यात आले. श्री कृपाहॉलमध्ये झालेल्या या कार्यक्रमाला भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, पनवेल महापालिकेच्या उपमहापौर सीताताई पाटील, नगरसेवक मनोहर म्हात्रे, एकनाथ गायकवाड, खांदा कॉलनी महिला मोर्चा शहर अध्यक्षा राखी पिंपळे, भीमराव पवार, माजी सरपंच शशिकांत शेळके, प्रभाग अध्यक्ष शांताराम महाडिक, भटके विमुक्त आघाडीचे खांदा कॉलनी शहर अध्यक्ष गोपीनाथ मुंडे, युवा मोर्चा खांदा कॉलनी अध्यक्ष अभिषेक भोपी, ज्येष्ठ नेते उमेश मांजरेकर, दत्तात्रेय खंडागळे, सुनीता गुरव, कृष्णा पाटील, अविनाश गायकवाड, नवनाथ मेंगडे, अविनाश पाटील, प्रेमा भोपी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, रायगड जिल्ह्यात भारतीय जनता पक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली काम करीत आहे. काम करीत असताना आपल्यापर्यंत अनेक प्रकल्प घेऊन येण्याची संधी आम्हाला मिळत आहे, असे सांगून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना उदंड आयुष्य लाभो, असे म्हटले.



## अपघातग्रस्तांचे प्राण वाचवा, लाखांचा पुरस्कार मिळवा!

**पनवेल : वार्ताहर**

अपघातातील जखमींना वेळेत रुग्णालयात पोहचविणाऱ्यांना जिल्हास्तरावर पाच हजार रुपये मिळतील. शिवाय राज्यभरातून यातील दहा जणांना प्रत्येकी एक लाख रुपयांचा पुरस्कार दिला जाणार आहे. यासाठी जिल्हास्तरावर समिती स्थापन करण्याचे निर्देश राज्य परिवहन आयुक्तांनी जिल्हाधिकारी तसेच पोलीस अधीक्षक कार्यालयाला दिले आहेत.

शहरासह जिल्ह्यातील विविध गावांतून जाणाऱ्या रस्त्यांवर तसेच महामार्गावरील होणारे अपघात रोखण्यासाठी महामार्ग पोलीस आणि वाहतूक नियंत्रण पोलिसांकडून विविध उपाययोजना राबविले जातात. आता अपघातग्रस्तांचे प्राण वाचविणाऱ्यांना राज्य आणि जिल्हास्तरावर रोख पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. अपघातात जखमी झालेल्यांना वेळेत रुग्णालयात पोहचविल्यास त्या नागरिकाला जिल्हास्तरावर पाच हजार रुपये रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे, तर राज्यस्तरावरही पुरस्कृत केले जाणार आहे. राज्यातील दहा जणांची निवड करुन त्यांना प्रत्येकी एक लाख रुपये आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे.



**पनवेल : स्व. लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या स्मृतीस भाजप ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ यांच्या जनसंपर्क कार्यालयात अभिवादन करण्यात आले. या वेळी हेमंत भुजबळ, विवेक सुरपाटणे, योगेश ओतारी, बेंजामिन खराडे, विनोद सकपाळ, राजश्री भुजबळ उपस्थित होते.**



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त वॉर्ड नंबर ४चे नगरसेवक प्रवीण पाटील यांच्या नगरसेवक निधीतून खारघर सेक्टर २० येथे डस्टबिन वाटप करण्यात आले. या वेळी नगरसेवक प्रवीण पाटील, रामजी बेरा तसेच भरत कोंढाळकर, युवा मोर्चा उपाध्यक्ष शुभ पाटील, काही सोसायट्यांचे चेअरमन, सेक्रेटरी, पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.**



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून नगरसेवक मनोहर जानू म्हात्रे यांच्या निधीतून साईनगर येथे बसण्याचे बेंचेस तसेच डस्टबिनचे वाटप करण्यात आले आहे. या वेळी साईनगर रहिवासी संघाचे अध्यक्ष पांडुरंग मोकल, राजेंद्र सोनवणे, संतोष माने, श्री. गोयल, दशरथ भंडारी, सचिन गमरे, बाबू चौधरी, प्रकाश पाटील, विलास कोलटक्के, राघवेंद्र प्रताप, भाऊ शिंगटे, चंद्रकांत तांबडे, विवेक बिराजदार, रवींद्र सावंत, मोहन बंगेरा, बंटी सिंह, सारंग लादे, रूपेश घाग आदी उपस्थित होते.**

## संपादकीय

# पुन्हा जागरुकतेची गरज

गेल्या आठवडाभरात राज्यात मुंबई, ठाणे, पुणे तसेच महानगर क्षेत्रात कोरोना रुग्णांच्या संख्येत मोठी वाढ दिसून आली असून त्यामुळे महाविकास आघाडी सरकार खडबडून जागे झाले आहे. दरम्यान, महाराष्ट्रासोबतच कर्नाटक, तामिळनाडू आणि केरळ या राज्यांमध्येदेखील कोविड-१९च्या केसेसमध्ये मोठी वाढ नोंदली गेल्याने केंद्र सरकारने या चारही राज्यांना कोरोना चाचण्यांच्या बाबतीत अतिशय दक्ष राहण्याची तसेच कोरोना साथीच्या फैलावाकडे बारकाईने लक्ष देण्याची सूचना केली आहे.

**महाराष्ट्रात १६ एप्रिल रोजी उपचाराधीन कोविड रुग्णांची संख्या ६२६ इतकी होती, परंतु गेल्या अवघ्या दीड महिन्यात त्यात सात पट वाढ झाली असून रुग्णालयात उपचार घेत असलेल्या कोविड रुग्णांची संख्या आता साडेचार हजारावर गेली आहे. ही वाढ निश्चितच कुणालाही काळजीत टाकेल अशीच असून खरे तर यापूर्वीच राज्य सरकारला कोरोना पुन्हा डोके वर काढतो आहे हे ध्यानात यायला हवे होते. गेले सलग दोन दिवस राज्यात एक हजाराच्या वर रुग्णसंख्या नोंदली गेली. गुरुवारी राज्यात १,०४५ रुग्ण आढळले तर मुंबईतील एका कोविड रुग्णाचा मृत्यू झाला. राज्यात कोरोना रुग्णांचे बरे होण्याचे प्रमाण सध्या ९८.०७ टक्के इतके असले तरी कोरोना रुग्णसंख्येचा हा वाढत चाललेला आलेख चिंताजनक आहे. राज्य सरकारने मास्कसक्ती मागे घेतल्यापासून जनसामान्यांमधील कोरोनाची भीती पूर्णपणे निघून गेली आहे. कोरोना अद्याप आपल्या अवतीभवती आहे, याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही दिवसांपूर्वी पुनरुच्चारदेखील केला होता. राज्य सरकारने मात्र राज्यात रुग्णसंख्या वाढत असूनदेखील त्याकडे डोळेझाक करण्याचेच धोरण अनुसरले. लोकांची मास्क वापराची सवय सुटली तसेच लसीकरणाची मोहिमही पुरती थंडावली. मुंबईत कोरोनाचा पॉझिटिव्हिटी रेट सध्या आठवर जाऊन पोहोचलेला दिसतो आहे. एवढे झाल्यावर कुठे राज्यातील आघाडी सरकारला जाग आली असून आणखी १५ दिवस परिस्थितीकडे लक्ष ठेवून सरकार निर्णय घेणार असल्याचे सांगितले गेले आहे. ओमायक्रॉनचे नवनवे उपप्रकार सापडत असताना मुळात महाराष्ट्राने मास्कसक्ती दूर करण्याची गरजच काय होती असा सवाल आता तज्ज्ञ करीत आहेत. यापूर्वी काही गणितीय अहवालांतही जूनमध्ये आपल्याकडे कोविडची साथ येण्याचा इशारा देण्यात आला होता, परंतु राज्य सरकारला या इशाऱ्यांकडे लक्ष देण्याची गरज भासली नाही. राज्यात लसीकरण मोहिमही कमालीची थंडावली असून राज्यातील तब्बल १.७ कोटी लोकांनी लसीचा पहिला डोस घेतल्यानंतर अद्याप दुसरा डोस घेतलेला नाही. राज्यात सर्वांना दुसरा व तिसरा प्रतिबंधात्मक डोस मिळण्यास या वेगाने कमालीचा वेळ लागू शकेल. लसीकरणाचा संपूर्ण प्रभाव व्हावयाचा असेल तर लसीकरण विहित वेळेतच पूर्ण होणे आवश्यक असते. लसीकरणाचा मंदावलेला वेग लसीकरणाच्या मूळ हेतूशीच सुसंगत नाही हे आघाडी सरकारला कुणीतरी सांगण्याची गरज आहे. ही अवधी चालढकल विशिष्ट हेतूने तर नाही ना अशी शंका येते, कारण गेल्या वर्षी लसीकरण हा राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा मुद्दा असताना मात्र शासकीय यंत्रणेचे प्रतिनिधी घरोघरी जाऊन लोकांना लस टोचून घेण्यास विनवत होते. आता तर सर्वसामान्यांना लसीची गरजच वाटेनाशी झाली आहे. तेव्हा पुन्हा एकदा लसीकरणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी सरकारी यंत्रणा प्रयत्नशील होण्याची नितांत गरज आहे.**

# असंख्य आव्हाने पेलत कोकणचा हापूस सातासमुद्रापार...!

**खबरबात**
धम्मशील सावंत

आंबा हा फळांचा राजा हे जगमान्य आहे. सद्यस्थितीत आंबा हे एक सर्वत्र महत्त्वाचे पैसे मिळवून देणारे फळपीक झालेले आहे. कोकणातील हापूस चवीसाठी जगभर प्रसिद्ध आहे. वारंवार येणारी नैसर्गिक आपत्ती व असंख्य आव्हाने पेलत अलिबागचा हापूस आंबा तर सातासमुद्रापार पोहचला आहे. या मुळे येथील आंबा बाग़ायतदार सुखावला आहे. जांभुळपाड्यातील संदेश पाटील यांच्या आंबा बागायतमधील हापूसचा अमेरिकेत डंका वाजत आहे. अमेरिकेत अलिबागसह कोकणच्या इतर हापूस आंब्याने भाव खालेल्ला असून विभागातील केशर आंबाही मोठ्या प्रमाणात निर्यात होण्यास सुरुवात झालेली आहे. त्यामुळे आंब्यापासून आपल्याला परकीय चलन मोठ्या प्रमाणात मिळत आहे.

आंबा बागायतदार संदेश पाटील याबाबत बोलताना म्हणाले की, यावर्षी हवामान बदल होत प्रत्येक महिन्यात अवकाळी पावसाने हजेरी लावली. संपुर्ण कोकणात २ डिसेंबर रोजीच्या पावसाने आंबा बागायतदार यांचे कंबरडे मोडले. ३० तास सलग पाऊस व हवा यामुळे आंबा मोहर गळून पडला. तसेच पाण्याची पातळी वाढल्याने आंबा मोहर येण्याची प्रक्रिया मंदावली. डिसेंबर महिना आंबा बागायतदार यांच्यासाठी निराशाजनक गेला. अगोदर जो मोहर आला तो बुरशी व बुरशीजन्य रोगांनी नुकसानात गेला. जानेवारीमध्ये आलेला मोहोर अगोदरचे आंबे पाडून टाकले.





**रायगड जिल्ह्यातील जांभूळपाडा येथील आंबा बागायदार संदेश पाटील यांच्या हापूसने अमेरिकेतदेखील डंका वाजविला आहे.**

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कोकणच्या हापूसचा प्रभाव दिसून येत आहे.

आंबा पिकाखालील क्षेत्र आणि उत्पादनात भारताचा तसेच महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक लागतो. महाराष्ट्रात आंब्याचे क्षेत्र ३,५७,२९० हेक्टर आहे. मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रातील कोकण विभागातील हापूस आंबा निर्यात होत असून त्यापासून शेतकऱ्यांना चांगल्याप्रकारे पैसा मिळत आहे. हापूस आंब्यापाठोपाठ इतर

आंबा यावर्षी उशिरा आलेला आहे. रत्नागिरी व देवगडचा आंबा संपत चालला आहे. त्यामुळे अलिबाग व रायगडच्या आंब्याला मोठी बाजारपेठ उपलब्ध होत आहे. अलिबाग तालुका हापूस उत्पादनात अग्रगण्य तालुका आहे. अलिबागच्या हापूसला मोठी पसंती आहे. ग्राहकदेखील मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहेत. मात्र आंबा उशिरा आल्याने मजूर उपलब्ध होत नाहीत. पूर्वी १५ मार्च ते मेअखेर वेळ मिळत होता. आता फक्त ५ ते ३० मे इतका वेळ मिळतो. आंबा पडूनदेखील नुकसान होतेय. त्यामुळे फारच घाई होते. अशात चांगले दर व मार्केटिंग यावर आम्ही काम करतोय. आता आंबा काढण्याचा हंगाम जूनपर्यंत राहणार आहे. जूनमध्ये पाऊस पडला तर आंबा पिकांचे मोठे नुकसान होणार आहे. फवारणी व इतर खर्च वाढला आहे. हा परवडणारा नाही. यातच एक दिलासादायक बाब म्हणजे कोरोनानंतर परदेशातील मार्केट आता व्यापार विनिमयासाठी मोकळे झाले आहे. अमेरिकेसारख्या राष्ट्रात कोकणातील अलिबागच्या हापूसला मागणी वाढल्याने सुगीचे दिवस आलेत, असे म्हणायला हरकत नाही. वादळ व पाऊस यामुळे खुप मोठ नुकसान झाले. पुढचे दहा वर्ष हे नुकसान भरून येणारे नाही. कोकणातील शेतकरी कधी निराश होत नाहीत. कोविडमध्ये आंबा कमी असून उत्पादन चांगले मिळाले असेही संदेश पाटील म्हणाले.

कोरोनामुळे आंतरराष्ट्रीय प्रवासावर लादलेल्या निर्बंधांमुळे विकेंद्रीकरण सुविधांच्या तपासणीसाठी युएसडी निरीक्षकांना भारतात भेट देता आली नव्हती. म्हणून २०२०मध्ये भारतीय आंब्याच्या निर्यातीवर अमेरिकेने निर्बंध घातले होते. दरम्यान हे निर्बंध हटविले आहेत. यामुळे निर्यातदारांना चांगल्या व्यवसायाची आशा असल्याने बहुतेकांनी व्यापाऱ्यांच्या माहितीनुसार यावर्षी अमेरिकन बाजारपेठेत केसरऐवजी हापूसला जास्त मागणी आहे.

कोविड महामारीने दोन वर्षांपासून देशात विविध ठिकाणी पिकाला जाणारा आंबा परदेशात विकला गेला नव्हता. त्यामुळे आंबा उत्पादक व शेतकरी यांना याचा मोठा फटका बसला होता. मात्र आता संधीची दारे खुली झाली आहेत. यंदा आंब्यांची निर्यात परदेशात होणार असल्याने आंब्याला चांगला भाव मिळण्याची शक्यता आहे. दरम्यान उत्तम दर्जाचा आंबा निर्यात होणार असल्याने आंबा उत्पादक शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होत आहे. दोन वर्षांपासून असलेली निर्यात बंदी उठवल्याचा फायदा होणार आहे.

**रायगड जिल्ह्यात फळबागांचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर आहे. यामध्ये आंबाबागांचे क्षेत्र १४ हजार हेक्टर इतके आहे. उत्पादनक्षम आंबा बागा या १२,५४० हेक्टर क्षेत्रावर आहेत. मागील दोन वर्षात निसर्ग व तौक्ते चक्री वादळाने फळबागा व आंबा बागायती क्षेत्राचे मोठे नुकसान झाले. निसर्ग चक्री वादळाने जवळपास ८,००० हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले आहे. तर तौक्ते चक्री वादळाने जवळपास १,१०० हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले आहे. शासनाकडून एनडीआरएफ व एसडीआरएफच्या नॉर्मनुसार शासनाकडून नुकसान भरपाई देण्यात आली आहे. कृषी विभागामार्फत ज्या फळ बागा क्षेत्रांचे नुकसान झाले. त्या क्षेत्रात फळबाग पुनर्लागवड व पुनर्जीवित करण्याचे काम मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. आजपर्यंत ४,१२३ शेतकऱ्यांना १३ कोटी रक्कम वितरित केलेली आहे. अजूनही २२,३६४ शेतकऱ्यांना जवळपास २७ कोटींचा निधी वितरित करणार आहोत. सदर निधी मंजुरीकरिता शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. लवकरच हा निधी देखील वितरीत केला जाईल. फळबागांचे मागील दोन वर्षांपासून होणाऱ्या नुकसानीतून सावरण्यासाठी कृषी विभाग शासनाच्या माध्यमातून प्रयत्न करीत आहे. दरम्यान रायगड अलिबाग येथील आंबा परदेशात निर्यात होत असल्याने आंबा उत्पादकाना चांगली संधी उपलब्ध झाली ही समाधानकारक बाब आहे.**

**-दत्तात्रेय काळभोर, उपसंचालक कृषी विभाग अलिबाग रायगड, प्रभारी कृषी अधीक्षक अलिबाग रायगड**

## बदलते तंत्रज्ञान

### इलेक्ट्रॉनिक उत्पादनांवरील 'सीई'मागचे कारण घ्या समजून

जवळपास प्रत्येक उत्पादनावर 'सीई' असा टॅग लिहिलेला असतो. जेव्हा आपण एखादे इलेक्ट्रॉनिक उत्पादन खरेदी करतो, तेव्हा त्याच्या पॅकिंगचा नक्कीच विचार करतो. तुम्ही जर कधी त्याचे पॅकिंग पाहिले असेल तर तुमच्या लक्षात आले असेल की प्रत्येक उत्पादनावर अनेक प्रकारची माहिती लिहिलेली असते. पण जवळपास प्रत्येक उत्पादनावर 'सीई ' असा टॅग लिहिलेला असतो. बहुतेक लोक त्याकडे दुर्लक्ष करतात किंवा त्याचा अर्थ जाणून घ्यायची देखील देखील त्यांची इच्छा नसते.




तुमचा मोबाईल चार्जर असो किंवा लॅपटॉप चार्जर, त्या सर्वांवर 'सीई' चिन्ह असते. वास्तविक हा एक विशेष टॅग आहे. याचा अर्थ काय ते आपण जाणून घेऊया.

युरोपियन देशांमध्ये १९८५पासून सर्व इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या मागील बाजूस हे 'सीई' चिन्ह लागू केले गेले. पूर्वी हे चिन्ह 'सीई' ऐवजी 'ईसी' असायचे. याचा अर्थ 'कॉन्फॉमाईट युरोपियन. उत्पादनावर या चिन्हाची उपस्थिती म्हणजे हे उत्पादन तयार करणाऱ्या कंपनीने युरोपच्या मानकांची काळजी घेतली आहे.

'सीई' लिहिलेली सर्व उत्पादने बनवताना या गोष्टींची काळजी घेतली जाते. या चिन्हाचा अर्थ असा आहे की कंपनी या चिन्हासह उत्पादन कायदेशीररित्या बाजारात विकू शकते आणि अशी उत्पादने इतर देशांमध्ये निर्यात देखील केली जाऊ शकतात.

दरम्यान, आपण एखादी वस्तू खरेदी करत असताना त्या वस्तूची बारीक सारीक माहिती आपल्याला असणे गरजेचे असते. सध्या जग हे माहितीचे युग झाले आहे. त्यामुळे सध्या कोणतीही माहिती मिळविणे सहज सोपे झाले आहे. अगदी साध्या-साध्या वस्तूंची माहिती म्हणजे कमी किमतीच्या वस्तूंची माहिती मिळाली नाही तरी चालू शकते पण जेव्हा किमती वस्तू असतात त्याची माहिती प्रत्येकाने मिळविणे गरजेचे असते.

# लोकप्रिय मराठी अभिनेते अशोक सराफ

अशोक सराफ हे एक लोकप्रिय मराठी अभिनेते आहेत. त्यांचा जन्म ४ जून १९४७ रोजी झाला. मराठी चित्रपटांसोबत त्यांनी अनेक हिंदी चित्रपटांतही विविध भूमिका केल्या आहेत.

दूरचित्रवाणीच्या छोट्या पडद्यावरील हम पांच सारख्या मालिकेमध्येही त्यांनी अभिनय केला. लक्ष्मीकांत बेर्डे यांच्यासोबत मराठी चित्रपटसृष्टीतील विनोदी चित्रपटांचा काळ गाजविणारे अशोक सराफ हे एक मराठी सुपरस्टार आहेत. सिने अभिनेत्री निवेदिता जोशी या सराफांच्या पत्नी आहेत. नाट्यअभिनेते रघुवीर नेवरेकर हे त्यांचे मामा होते. त्यांनी अनेक चित्रपटात विनोदी भूमिका करण्याबरोबरच काही चित्रपटात खलनायकी तसेच विविध भूमिका तितक्याच ताकदीने व रसिकांच्या आयुष्यभर स्मरणात राहतील अशा साकारलेल्या आहेत. उत्कृष्ट

**निमित्त**

अभिनय, सहज विनोद प्रवृत्ती, चेहऱ्यावरील कमालीचे हावभाव, विनोदाची अचूक वेळ, आदि त्यांच्या अभिनयाची वैशिष्ट्ये होती. अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे, सचिन पिळगांवकर, महेश कोठारे या अभिनेत्यांनी मराठी चित्रपटामध्ये फार मोठा काळ गाजविला आहे. चित्रपट क्षेत्रात मामा या नावाने ते प्रसिद्ध आहेत.

मूळचे बेळगावचे असणाऱ्या अशोक सराफ यांचा जन्म मुंबईत झाला. दक्षिण मुंबईतील चिखलवाडी या भागात त्यांचे बालपण गेले. गोपीनाथ सावकार हे त्यांचे मामा होत. अशोक सराफ यांचे शिक्षण मुंबईतील डी.जी.टी.




विद्यालयात झाले. त्यांना सुरुवातीपासूनच नाटकांची अतिशय आवड होती. वयाच्या अठराव्या वर्षी त्यांनी शिरवाडकरांच्या ' ययाती आणि देवयानी ' या नाटकातील विदुषकाच्या भूमिकेद्वारा व्यावसायिक रंगभूमीवर प्रवेश केला. काही संगीत नाटकांतूनदेखील त्यांनी भूमिका केल्या.

गजानन जागीरदार यांच्या 'दोन्ही घरचा पाहुणा' या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिका केली. त्यानंतर दादा कोंडके यांच्या 'पांडू हवालदार' मधील इरसाल पोलीस, 'राम राम गंगाराम' मधील म्हमद्या खाटीक अशा बहुढंगी भूमिका त्यांनी लीलया साकारल्या. मराठी रसिकांच्या गळ्यातील ताईत असणाऱ्या अशोक सराफ यांचे नाटक, सिनेमा आणि दूरचित्रवाणी या त्रिस्थळी काम आहे आणि प्रत्येक माध्यमात त्यांनी अभिनयाची पारितोषिके व पुरस्कार मिळविले आहेत.

अशोक सराफ यांनी केवळ विनोदीच नव्हे तर गंभीर स्वरूपापासून ते खलनायकी प्रवृत्तीपर्यंत विविध छटांचे दर्शन त्यांनी आपल्या नाट्य-चित्रसृष्टीतील कामाद्वारे घडविले आहे. दादा कोंडकेंबरोबर पांडू हवालदार, कळत नकळत, भस्म यासारख्या चित्रपटातून त्यांनी प्रेक्षकांपुढे अभिनयाचे वेगळेच पैलू उलगडले. वजीर सारख्या चित्रपटातून राजकारणी व्यक्तिरेखा त्यांनी साकारली. चौकट राजामध्ये सहृदय गुणाच्या व्यक्तिरेखा केली. ऐंशीच्या दशकात लक्ष्मीकांत बेर्डे यांच्यासमवेत त्यांची जोडी प्रचंड गाजली आणि या जोडगोळीने अशी ही बनवाबनवी, धूमधडाका, दे दणा दण यासारख्या चित्रपटांमार्फत धमाल उडवून दिली. अशोक सराफ यांच्या बहुरंगी अभिनयाला सचिन पिळगांवकर, महेश कोठारे यासारख्या कसलेल्या दिग्दर्शकांची साथ मिळून नवरी मिळे नवऱ्याला, आत्मविश्वास, गंमत जंमत, आयत्या घरात घरोबापासून अलीकडच्या शुभमंगल सावधान, आई नंबर वन' व 'पहिली शेर दुसरी सव्वाशेर नवरा पावशेर'पर्यंत असंख्य चित्रपटांनी मराठी रसिकांना खिळवून ठेवले.

'अनधिकृत' या त्यांच्या रंगभूमीवरील पुनरारंभाच्या नाटकास योग्य प्रतिसाद मिळाला नाही. पत्नी निवेदिता जोशी-सराफ यांच्यासोबत त्यांनी एक निर्मिती संस्था स्थापन करून 'टन टना टन' (मराठी) व काही हिंदी मालिका बनवल्या. हम पांच या झी वाहिनीवरील हिंदी मालिकेने त्यांना विशेष लोकप्रियता मिळवून दिली. हिंदी चित्रपटसृष्टीत त्यांनी 'दामाद' या चित्रपटाद्वारे पाऊल ठेवले. 'करण अर्जुन', 'कोयला', 'येस बॉस', 'जोडी नं.१' हे अशोक सराफ यांचे काही उल्लेखनीय चित्रपट. अमेरिकेतील सिएटल येथे झालेल्या बृहन्महाराष्ट्र कन्व्हेन्शन २००७ येथे विजय केंकरे दिग्दर्शित 'हे राम कार्डिओग्राम' या नाटकाद्वारे त्यांनी परदेशी रंगमंचावरही पाऊल ठेवले आहे.



**क्लिक...क्लिक...!**

**मुरुड : पाऊस जवळ आला की निसर्ग आपले रंग बदलतो. मुरुड येथील समुद्राने किनाऱ्यावरील कचरा आपल्या पोटात घेतला असून वाळू काळी झाल्याचे दिसून येत आहे.**
(छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

### हार्ट अटॅक येण्याची कारणे घ्या जाणून

ताणविरहीत आयुष्य जगण्याचा प्रत्येकाने प्रयत्न करायला हवा. व्यायाम, आहार, झोप यासारख्या गोष्टींकडे सुरुवातीपासून लक्ष दिले तर अचानक आरोग्याच्या समस्या उद्भवणार नाहीत. हार्ट अटॅक ही अशी गोष्ट आहे की, काही क्षणात आपले आयुष्य होत्याचे नव्हते होते. आपल्याला काही कळायच्या आत त्रास सुरू होतो आणि आयुष्य संपते. पूर्वी हार्ट अटॅक येण्याचे वय हे साधारण ६०च्या पुढे होते. मात्र आता ते वय ४०पर्यंत आले आहे. त्यामुळे कमी वयात हृदय कमकुवत होणे ही आरोग्याच्या दृष्टीने नक्कीच चिंताजनक बाब आहे. आपल्या जीवनशैलीत झालेले बदल हे यामागील सर्वात मोठे कारण आहे. आपण शारीरिक आणि मानसिक आरोग्याची योग्य पद्धतीने काळजी घेत नसल्याने हा आजार आपले आयुष्य संपविण्यासाठी कारणीभूत ठरत आहे. भारतात २०२०पर्यंत सर्वाधिक मृत्यू हे हार्ट अटॅकने होणार असल्याचे प्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. सी.एन. मंजुनाथन याचे म्हणणे आहे. यासाठी आपल्या जीवनशैलीमध्ये बदल करण्याची आवश्यकता असून वेळीच लक्ष न दिल्यास हा प्रश्न गंभीर होईल असे त्यांचे म्हणणे आहे.

हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्यांमध्ये काही कारणाने ब्लॉकेजेस झाले तर हा रक्तपुरवठा अनियमित होतो. त्यामुळे हृदयाच्या कामात अडथळा निर्माण होतो. ही समस्या साधारणपणे लक्षात येत नसल्याने वयाच्या तिशीनंतर दर एक ते दोन वर्षांनी मेडिकल चेकअप करणे आवश्यक आहे. रक्ताच्या माध्यमातून हृदयाला पुरेसा ऑक्सिजन पुरवठा झाला नाही तर ही समस्या उद्भवते. त्यामुळे तुम्हाला लठ्ठपणा, बीपी, मधुमेह यासारख्या आरोग्याच्या समस्या असतील तर वेळच्यावेळी तपासण्या आणि औषधोपचार करणे गरजेचे आहे. हार्ट अटॅक अत्यंत तीव्र किंवा मध्यम स्वरूपाचा असतो.

**अपुरी झोप**- आता कामाच्या वेळा, सोशल मीडियाचे व्यसन आणि इतर गोष्टींमुळे आपल्यातील बहुतांश लोक हे मध्यरात्री झोपतात. मात्र याचा शरीरावर विपरित परिणाम होतो. हे आपल्या लक्षात येत नाही आणि मग अचानक आरोग्याच्या तक्रारी उद्भवल्या की आपले डोळे उघडतात.

**चुकीचा आहार** – हृदयरोगासाठी कोलेस्टेरॉल हा महत्त्वाचा घटक कारणीभूत असतो. मैदा, तेल, मसालेदार पदार्थ, साखर, फॅटी फूड यासारख्या गोष्टींमुळे शरीरातील कोलेस्टेरॉलची पातळी वाढते आणि रक्तवाहिन्यांमध्ये अडथळा येत समस्या उद्भवते.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# जलवाहिनी चोरीप्रकरणी आज पोलादपूर पोलीस ठाण्यासमोर उपोषण

## काँग्रेसचे अमोल भुवड आक्रमक; कारवाई करण्याची मागणी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

नगरपंचायतीच्या प्रभाग क्रमांक १मधील सावंतकोंड पार्टेकोंड येथील जलवाहिनी चोरीप्रकरणी आरोपींना अटक करावी, या मागणीसाठी काँग्रेस शहराध्यक्ष अमोल भुवड हे शनिवारी (दि. ४) पोलादपूर पोलीस ठाण्यासमोर उपोषणास बसणार आहेत.



पोलादपूर नगरपंचायतीच्या अखत्यारीतील सावंतकोंड, पार्टेकोंडदरम्यानचा जुना लोखंडी पुल दोन महिन्यांपूर्वी चोरीला गेल्यानंतर एफआयआर दाखल झाली, मात्र चोरांना अटक करण्यात चालढकल होऊन या लोखंडी पुलाचे भग्नावशेष घटनास्थळी टाकण्यात आले. त्यानंतर अमोल भुवड यांनी या प्रकरणी आरोपींना अटक करावी, या मागणीसाठी उपोषणाचा इशारा दिल्यानंतर याच सावंतकोंड, पार्टेकोंडमधील जलवाहिनीची चोरी झाली.

लोखंडी पुल आणि जलवाहिनी चोरांना अटक करावी या मागणीसाठी शनिवारी उपोषण करण्याचा इशारा भुवड यांनी निवेदनाद्वारे दिला होता या निवेदनाच्या प्रती भुवड यांनी पोलादपूर पोलीस ठाण्यासह रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हाधिकारी, महाड प्रांताधिकारी आणि पोलादपूर तहसीलदार यांनाही दिल्या आहेत.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त वृद्धाश्रमात शिधावाटप

## भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित घाग यांचा उपक्रम

**धाटाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याचे भाग्यविधाते माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त दक्षिण रायगड भाजप युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष अमित घाग यांच्या माध्यमातून गुरुवारी (दि. २) कोलाड येथील कालकाई प्रसन्न वृद्धाश्रमात शिधावाटप करण्यात आले.

युवा मोर्चाचे रोहा तालुकाध्यक्ष राजेश डाके, भाजप महिला मोर्चाच्या दक्षिण रायगड चिटणीस श्रद्धा घाग, रोठ बुद्रुक ग्रामपंचायतीच्या उपसरपंच वेदिका डाके, रोहा तालुका कामगार सेलचे अध्यक्ष विलास डाके, अविनाश कान्हेकर, दिनेश सुटे, श्रीकांत दरडे, अमर वारंगे यांच्यासह भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.



(छाया : जितेंद्र जाधव)

# गारपोली, उकरूळ येथील वीज रोहित्रांना नवीन पेटी



(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील उमरोली ग्रामपंचायत हद्दीतील गारपोली आणि उकरूळ गावातील वीज रोहित्रांना महावितरणने शुक्रवारी (दि. ३) नवीन झाकणे असलेल्या पेट्या बसविल्या आहेत. सामाजिक कार्यकर्ते किशोर गायकवाड यांनी दोन दिवसांपूर्वी महावितरणच्या उपअभियंत्यांकडे या नादुरुस्त पेट्यांबाबत तक्रार दाखल केली होती.

कर्जत तालुक्यातील गारपोली येथील वीज रोहित्राच्या सुरक्षेसाठी असलेली लोखंडी पेटी कोसळली होती. महावितरणने तत्परता दाखवत शुक्रवारी सकाळीच या रोहित्रास नवीन लोखंडी पेटी बसविली. महावितरणचे वायरमन बाबू बांगरी, दिलीप ठोंबरे, ठेकेदार कौशल गुरव आदींनी हे काम केले. त्यानंतर उकरूळ गावातील वीज रोहित्रालाही नवीन लोखंडी पेटी बसविण्यात आली. त्या वेळी संदीप राऊत, गणेश राऊत, मिलिंद पारधी, उमेश शेळके, ॲड. उत्तम गायकवाड, किशोर गायकवाड यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# कर्जत तिवरे येथील महिलेची गंठण खेचून नेण्याचा प्रयत्न

**कर्जत : बातमीदार**

शहरातील मुद्रे येथील राजेश काशिनाथ ठाणगे हे आपल्या पत्नीसह कर्जत तालुक्यातील तिवरे गावात शुभकार्यासाठी गेले होते. तेथून घरी परत येण्यासाठी आपल्या चारचाकी वाहनाकडे जात असताना चार अज्ञात व्यक्तींनी राजेश ठाणगे यांच्या पत्नीच्या गळ्यातील सोन्याची गंठण खेचून नेण्याचा प्रयत्न केला. या बाबत कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

तिवरे गावातील हळदी समारंभ उरकून राजेश ठाणगे मध्यरात्री साडेबारा वाजता पत्नीसह कर्जत येथे घरी येण्यासाठी निघाले. ते आपल्या चारचाकी वाहनाकडे जात असताना दबा धरून बसलेल्या एका अज्ञात व्यक्तीने अंधाराचा फायदा घेवून ठाणगे यांच्या पत्नीच्या गळ्यातील सोन्याची गंठण खेचण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी त्या ठिकाणी लपून बसविलेले आणखी तीन तरुण तेथे आले. ठाणगे दांपत्याने आरडाओरड केली. त्यावेळी ते चारही तरुण तेथून पळून गेले.

याबाबत राजेश ठाणगे यांनी कर्जत पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, अधिक तपास सहाय्यक निरीक्षक सोनवणे करीत आहेत.

# खोपोलीत स्व. गोपीनाथ मुंडे यांना अभिवादन

**खोपोली : प्रतिनिधी**

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री लोकनेते गोपीनाथ मुंडे यांना त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त शुक्रवारी (दि. ३) खोपोली भाजपतर्फे अभिवादन करण्यात आले.

भाजपचे खोपोली शहर चिटणीस हेमंत नांदे यांनी या वेळी मुंडे यांच्या काही आठवणी जागवल्या. खोपोली भाजप कार्यालयाचे उद्‌घाटन त्याचप्रमाणे खोपोली नगर परिषदेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या समवेत गोपीनाथ मुंडे खोपोलीत आले होते. त्यावेळी पक्ष कार्यकर्त्यांशी चर्चा करून पक्षसंघटना अधिक मजबूत कशी होईल, याबाबत मुंडे यांनी मार्गदर्शन केल्याचे नांदे यांनी सांगितले.



(छाया : विनायक माडपे)

शहर मध्यवर्ती भाजप कार्यालयात शुक्रवारी झालेल्या या कार्यक्रमाला भाजपचे खोपोली शहर उपाध्यक्ष दिलीप पवार, माजी अध्यक्ष विजय तेंडुलकर, चिटणीस गोपाळ बावस्कर, महिला मोर्चाच्या कोषाध्यक्षा जिल्हा रसिका शेटे, ज्येष्ठ कार्यकर्त्या स्नेहल सावंत, विमल गुप्ते, सुमिती महर्षी, विमल गुप्ते, वैद्यकीय सेलचे जिल्हा संयोजक डॉ. बबन नागरगोजे, विकास खुरपुडे, संजय म्हात्रे, व्यापारी सेलचे कीर्ती ओसवाल यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी स्वर्गीय गोपीनाथजी मुंडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून त्यांना अभिवादन केले.



## जाहीर नोटीस

माझे अशिल श्री. मनोहर लक्ष्मण ओवळेकर वय–सज्ञान, व्यवसाय बांधकाम व्यावसायिक, रा. : मु. तरघर, पो. उलवे, ता. पनवेल, जि. रायगड, यांच्या वतीने सर्व जनतेस सदर नोटीसीद्वारे असे सुचित करण्यात येते की खालील वर्णनाच्या जमिनीचे मालक श्री. हेमंत नामदेवराव नगराळे वय–सज्ञान, व्यवसाय–नोकरी, राहणार : १३ ए, निलीमा बिल्डींग, बि. जी. खेर रोड मलबार हिल पोलीस स्टेशनजवळ, मलबार हिल मुंबई ४०० ००६. यांच्या मालकीची खालील वर्णनाची जमीन आहे. सदर जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**जमिन (मिळकतीचे) वर्णन**

| अ. क्र. | सर्व्हे नं. | ठिकाण | क्षेत्र हे–आर–पॉ | आकार रूपये पैसे |
|---|---|---|---|---|
| ०१. | १ | मौजे–नानोशी, तलाठी सजा मोसारे, ता. पनवेल, जि. रायगड | ०–२५–३० | १=५६ |

**या वर्णनाची जमिन** माझे अशिल **''खरेदी विक्रीच्या करारनाम्यानुसार''** कायमस्वरूपी खरेदी करीत आहेत. तरीही याबाबत कोणाही व्यक्ती व्यक्तींचे किंवा आर्थिक संस्थाचे वरील जमिनीसंबंधी कुठल्याही प्रकारचा दावा हरकती जसे विक्री, गहाण, ताबा, जबाबदारी, बक्षिस, भेट, भाडेपट्टा, वारसाहक्क, कर्ज असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत या जमिनीच्या संबंधातील दस्तऐवजांच्या प्रमाणित प्रतीसह माझ्या कार्यालयीन पत्त्यावर संपर्क साधावा अन्यथा सदर जमिनीच्या खरेदी–विक्री बाबतचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर आलेल्या कुठल्याही प्रकारच्या हरकती तक्रारींचा विचार करण्यात येणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

सही/–
**श्री. निरंत वासुदेव पाटील**
**(ॲडव्होकेट)**
कार्यालय : तळमजला, प्लॉट नं. बी–४०, से. २०, अष्टविनायक बिल्डींग, नेरूळगाव, नवी मुंबई. ७०६. फो.नं.९३२४५६९८०६.


# रायगडचा नंदुरबारवर डाव आणि १९४ धावांनी दणदणीत विजय

## नैतिक सोळंकीचे १३ बळी, तर स्मित पाटीलचे शानदार शतक

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या पुणे येथे सुरू असलेल्या सोळा वर्षाखालील मुलांच्या आमंत्रितांच्या स्पर्धेत रायगडने नंदुरबारवर एक डाव आणि १९४ धावांनी दणदणीत विजय मिळवला. या सामन्यात रायगडच्या नैतिक सोळंकीने दोन्ही डावात मिळून १३ बळी घेतले. तर स्मित पाटीलचे आक्रमक शतक (१११ धावा) झळकावले.

नाणेफेक जिंकून नंदुरबार संघाने फलंदाजी स्वीकारली. त्यांचा पहिला डाव १५४ धावात संपला. लेगस्पिनर नैतिक सोळंकीने १४ षटकात ३८ धावा देत सहा बळी घेतले. शुभम पाटील याने दोन बळी घेतले. अमेय पाटील व सर्वेश उलवेकर यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. रायगडने आपला पहिला डाव ७ बाद ४१३ या धावसंखेवर घोषित केला. पहिल्या डावात रायगडला २५९ धावांची भक्कम आघाडी मिळाली. नंदुरबार संघाचा दुसरा डाव केवळ २७.४ षटकात ६५ धावात आटोपला.

रायगडच्या पहिल्या डावात स्मित पाटीलने आक्रमक फलंदाजी करून शतक झळकावले. त्याने १०६ चेंडूचा सामना करून १११ धावा केल्या. ओम म्हात्रे (७८ धावा), सर्वेश उलवेकर (३८), अमित शर्मा (५१), क्रिश पाटील (४३ ) यांनी चांगली फलंदाजी केली.

नंदुरबार संघाच्या दुसऱ्या डावातदेखील नैतिक सोळंकी याने १३ षटकांत १० धावा देत सात बळी घेतले. त्याने एका षटकात तीन बळी घेतले. अमय पाटीलने दोन बळी व राहुल सिंग याने एक बळी मिळवत त्याला चांगली साथ दिली. नंदुरबारचा दुसरा डाव केवळ २७.४ षटकात ६५ धावात आटोपला.

रायगड संघाचे व्यवस्थापक प्रशिक्षक जॉन्टी गिलबिले यांनी खेळाडूंकडून चांगली कामगिरी करून घेतली. रायगड संघाचे रायगडमधील क्रिकेट प्रेमी नागरिकांकडून कौतुक होत आहे. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते आणि सर्व सभासदांनी संघाचे अभिनंदन केले.

# रायगडात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची प्रभावी अंमलबजावणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

मजुरांच्या हाताला काम मिळावे तसेच त्यांच्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह व्हावा, या उद्देशाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेची रायगड जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी सुरू असून, जिल्ह्यात २०२१–२२ या आर्थिक वर्षात तीन लाख ६५ हजार ६२० इतकी मनुष्यबळ दिवस निर्मितीची नोंद झाली आहे. ही मनुष्यबळ निर्मिती जिल्ह्याला मिळालेल्या उद्दिष्टपूर्तीच्या १७३.२६ टक्के असल्याची माहिती, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील व महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेचे गटविकास अधिकारी संजय चव्हाण यांनी दिली.

महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामीण भागातील मजुरांना अकुशल स्वरूपात नियमित कामे देऊन १०० मनुष्य दिवस रोजगार निर्मितीची हमी देण्यात आली आहे. या योजनेतंर्गत जिल्ह्यात मजुरांच्या कुटुंबाला अधिकाऱ्यांनी भेट देऊन आवश्यक असलेली कामे यांची नोंद घेतली. तसेच ग्रामसभे मार्फत कामांची निवड करण्यात आली.

या योजनेअंतर्गत घरकुल योजना, वैयक्तिक शोषखड्डे, गुरांचे गोठे, सार्वजनिक कंपोस्ट खड्डे, शौचालये, गावातील अंतर्गत रस्ते, सिंचन विहिरी, फळबाग लागवड, वृक्ष लागवड, शेततळे यांसह इतर विकासकामे हाती घेण्यात येत असून, काम करणाऱ्या मजुरांना दिवसाला २४८ रुपये मजुरी देण्यात येते.

२०२१–२२ या वर्षात रायगड जिल्ह्याला दोन लाख ११ हजार १२ मनुष्यबळ दिवसांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. रायगड जिल्ह्यात या योजनेतंर्गत मोठ्या प्रमाणात कामे हाती घेण्यात आल्याने, जिल्ह्यात वर्षभरात तीन लाख ६५ हजार ६२० मनुष्यबळ दिवस निर्मिती झाली असून, एकूण उद्दिष्टाच्या हे प्रमाण १७३.२६ टक्के इतके आहे.



## SRM E-TENDER NOTICE (SECOND CALL)

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | Tender No:- EE/EHV (O&M) /DIVN/MHD/ Tech/Tender-20/2022-23 Dtd. 11.05.2022 RFX No. 7000023217 | Sub. :- Second Call for SRM E-Tender for replacement of FCC Panel with new cooling fans for 50 MVA,100/22 kV Transformer No.1 at 100/22 kV Roha S/s under EHV (O&M) Dn. Mahad. | Rs. up to 382721/- (Including GST + 1% Labour CESS) |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- plus GST + 1% Labour CESS.
Bid submission is from 04.06.2022 @ 00:00 hrs to 12.06.2022 @23:59 Hrs for above tender
for further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No.7373101089
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**(Mr. Pankaj H. Talele)**
**Executive Engineer, EHV (O&M) Dn, Mahad**

## SRM E-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.


| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | Tender No:- EE/EHV (O&M) /DIVN/MHD/ Tech/Tender-29/2022-23 Dtd. 04.06.2022 Rfx No. 7000023461 | Sub :- Invitation of SRM E-Tender for weed control along with initial chemical treatment & rodent control treatment 220kV Mahad S/s 220kV Vile Bhagad S/s, 220kV Kandalgaon S/s, 100kV Roha S/s & 100kV Mhasala S/s under EHV (O&M) Division Mahad for the year 2022-23. | Rs. up to 6,52,241/- (Including GST + 1% Labour CESS) |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/-plus GST+1% Labour CESS.
Bid submission is from 04.06.2022 @ 00:00 hrs. to 12.06.2022 @ 23:59 Hrs. for above tender
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No. 7373101089
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**(Mr. Pankaj H. Talele)**
**Executive Engineer, EHV (O&M) Dn, Mahad**


# मुरूडमध्ये कोरोनाचा शिरकाव

**मुरूड : प्रतिनिधी**



तालुक्यात शुक्रवारी (दि. ३) एक कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळल्याने यंत्रणा सज्ज झाल्या असून, मुरूड तालुक्यातील हा दुसरा कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण असल्याने नागरिकांनी चिंता वाढली आहे.

पहिल्या लाटेत मुरूड तालुक्यात कोरोनाचा उद्रेक झाला होता. त्यात १११जणांचा जीव गमावला होता. यानंतर दुसऱ्या व तिसऱ्या लाटेत मुरूड तालुक्यातील जनतेने डॉक्टर व नर्सच्या सहाय्याने कोरोनाचा यशस्वीपणे मुकाबला केला होता, मात्र शुक्रवारी पुन्हा एक कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण सापडल्याने खळबळ उडाली आहे. या रुग्णाला मुरूड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यामुळे प्रशासनासह सर्वसामान्य नागरिकही चिंता व्यक्त करत आहे.



**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

## ऑफलाईन निविदा सूचना क्रमांक २० सन २०२२-२०२३

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन–४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५–२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे **बी–१** नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | भाग अ (स्थापत्य कामाची किंमत) | इसारा/ बयाणा रक्कम | ई–निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | कुडगांव हरवित तुरुंवाडी रस्ता प्रजिमा ५८ कि.मी. ०/०० ते १५/५००मध्ये रस्त्याची सुधारणा करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. (५०५४ मार्ग व पुल यांवरील भांडवली खर्च, ०४ इतर जिल्हा मार्ग | १२३७१६०८९ | ११८७२९८०२ | ६१९००० | ३३६० | १२ महिने |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **०७/०६/२०२२** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **२२/०६/२०२२** वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | **निविदापूर्व बैठक** | मा. मुख्य अभियंता, (सा.बां.) प्रादेशिक विभाग, कोकण, फोर्ट मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **१४/०६/२०२२** वेळ **१५.००** वाजता |
| ३ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधीक्षक अभियंता, रायगड सा.बां. मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **२७/०६/२०२२** वेळ १२.०० वाजता |

**टिप :–** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**सही/**
**(एम. आर. नामदे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/२३४८**
**दिनांक : ३१/०५/२०२२**

DEVKALA CHARITABLE TRUST
(REGD. NO. E-4994/Thane)

## D.A.P. PUBLIC SCHOOL, TONDARE (English Medium)

Ref. No. DAP/153/2022 **Requirement (Vacancy)** सांकेतांक क्र. एस १७.०१.१२७
Date : 31/05/2022
Academic Year : 2022-23

| Sr.no. | Name of the post | Qualification | Standerd | Subject | No.of. post |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Asst. Teachers | S.S.C./H.S.C. Montesary | Pre-Primary | All | 03 |
| 2 | Asst Teachers | D.Ed. | 1st to 8th | All | 05 |
| 3 | Asst Teachers | B.A.B.Ed/B.Sc.B.Ed/ B.Com B.Ed. | 9th to 10th | English/Maths/ Science/Hindi | 03 |
| 4 | H.M. | B.A.B.Ed/B.Sc.B.Ed/ B.Com B.Ed. | Secondary Section | All | 01 |
| | | | | Total | 12 |

- Candidates with fluency in english will be preferred.
- Interested Candidates should appear for the interview along with original documents on Wednesday 08/06/2022 at 10am to 2 pm.

Address : At Post, Tondare, Near Hanuman Temple, Tal : Panvel, Dist Raigad.
Contact No. : 9653434006 (Patil Sir)

**Sd/-**
**H.M.**
**D.A.P. PUBLIC SCHOOL, TONDARE**

# न्हावाखाडीतील कार्यक्रमाची चित्रझलक

































# वावोशी परिसरात मातीचे बेकायदा उत्खनन

## महसूल बुडविणारा स्थानिक पुढारी; कारवाई करण्याची ग्रामस्थांची मागणी

**खालापूर : प्रतिनिधी**

शासन नियम धाब्यावर बसवून वावोशी मंडल क्षेत्रात लाल मातीचे उत्खनन करून ती माती नव्याने विकसित होत असलेल्या गोदरेज कंपनीला पुरवठा करणारा स्थानिक पुढारी व गोदरेज कंपनी यांनी शासनाचा सुमारे एक कोटी रुपयांचा महसूल बुडवला आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात यावा व त्यांच्याकडून पाचपट दंड वसूल करावा, अशी मागणी डोणवत, नारंगी, वावोशी या पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी केली आहे.


(छाया : अरूण नलावडे)

खालापूर तालुक्यातील वावोशी मंडल क्षेत्रातील स्थानिक पुढाऱ्याने डम्पर, जेसीबीच्या सहाय्याने सतत आठ दिवस खरीवली येथील माळरानावरील लाल मातीचे मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर उत्खनन करून ती माती तांबाटी येथे नव्याने विकसित होणाऱ्या गोदरेज कंपनीच्या आवारात टाकली आहे. ही लाल माती कंपनी बागकामासाठी वापरणार असल्याची माहिती समोर येत आहे. दरम्यान, डोणवत व गोहेत तसेच गोदरेज कंपनीच्या आवारात लाल मातीचा साठा मोठ्या प्रमाणात करून ठेवण्यात आला आहे.

खरीवली येथील लाल मातीचे उत्खनन करून स्थानिक पुढाऱ्याने सुमारे एक कोटी रुपयांची रॉयल्टी बुडवून शासनाची फसवणूक केली आहे. तसेच कंपनीनेही लाल माती पुरवठा करणाऱ्या स्थानिक पुढाऱ्याला माती उत्खननाची रॉयल्टी भरली आहे का, याची विचारणा केली नाही. त्यामुळे रॉयल्टी बुडवून लाल मातीचे बेकायदेशीर उत्खनन करणारा स्थानिक पुढारी आणि गोदरेज कंपनी यांच्यावर फौजदारी कारवाई करण्यात यावी व शासनाच्या महसूल नियमाप्रमाणे पाचपट दंडात्मक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी डोणवत, नारंगी, वावोशी परिसरातील ग्रामस्थ करीत आहेत. खालापूर तहसील कार्यालयाला अंधारात ठेवून वावोशी मंडल अधिकाऱ्यांनी हा कारनामा केल्याचे स्थानिक ग्रामस्थ सांगत आहेत

याबाबत वावोशी मंडल अधिकारी तुषार कामत यांना विचारणा केली असता खालापूर तहसील कार्यालयामार्फत संबंधित जागेचा पंचनामा करण्यात आला आहे, मात्र माती उत्खनन करण्यासाठी कोणतीही परवानगी वा रॉयल्टी भरली नसल्याचे सांगत त्यांनी आपला भ्रमणध्वनी बंद केला, तर खरीवली सजा खानाव तलाठी सौ. राऊत यांनी दूरध्वनी बंद करण्यात धन्यता मानली. गोदरेजचे व्यवस्थापक चौधरी यांना संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता संभाषण होऊ शकले नाही.

या प्रकरणी मंडल अधिकाऱ्यांनी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली असल्याची तक्रार नायब तहसीलदार कल्याणी कदम यांच्याकडे केल्यानंतर भेदरलेले मंडल अधिकारी तुषार कामत यांनी, गोदरेज कंपनी व डोणवत येथे लाल मातीचे ढिगारे आढळून आले आहेत. त्यांचे पंचनामे करण्यात आले असून त्याचा अहवाल खालापूर तहसील कार्यालयाला सोमवार अथवा मंगळवारी सादर करणार असल्याचे सांगितले.

खालापूर तहसीलदार या संपूर्ण प्रकरणी काय कारवाई करतात याकडे वावोशी परिसरातील ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# रोहा तालुक्यात पाण्याची मुबलकता

## नियोजनाचा मात्र अभाव

**रोहे : प्रतिनिधी**

बारमाही वाहणारी कुंडलिका नदी, धो धो कोसळणारा पाऊस असे चित्र असतानाही रोहा तालुक्यातील काही भागाला उन्हाळ्यात पाणीटंचाईला सामोरे जावे लागते. स्थानिक लोकप्रतिनिधींची उदासीनता आणि अधिकाऱ्यांचा नियोजनशून्य कारभारामुळे रोहा तालुक्यात मुबलक पाणी असतानाही उन्हाळ्यात पाण्याचा प्रश्न उद्भवत आहे.

रोहा तालुक्यात पाण्याचे स्त्रोत मुबलक आहेत. त्याचा उपयोग होताना दिसत नाही. तालुक्यात पाऊस मोठ्या प्रमाणात पडत असतो. सुतारवाडीचे धरण वगळता अन्य ठिकाणी पाणी साठविण्याची व्यवस्था नाही. म्हासाडी धरणाच्या रुपाने चणेरा विभागात पाण्याची व्यवस्था होवू शकली असती. मात्र भूमीपूजन होवूनही एकही दगड धरणाच्या पायाला लावला गेला नाही. मध्यंतरीच्या काळात वन व कृषी खात्यांच्या माध्यमातून पाणी साठविण्यासाठी बंधारे बांधण्यात आले. परंतु गाळ काढण्यासाठी निधी नसल्याने हे छोटे बंधारे गाळात रुतले आहेत. लोकसहभागातून उभारण्यात आलेले बंधारे आज दुर्लक्षित झाले आहेत.वाशी, लांडर, तळाघर, बोरघर, निवी, वर्षे भुवनेश्वर, रोहा नगर परिषद येथे कारीवणे येथून मुबलक पाणी उपलब्ध होऊ शकते. त्यासाठी पाणीपूजन करण्यात आले. पुढे काय हा प्रश्न अद्याप सुटला नाही. पुर्वी भुवनेश्वरच्या माथ्यावरुन तेथील नागरिकांना पाणी मिळत होते. कालांतराने या स्त्रोताकडे दुर्लक्ष झाले. रोहा तालुक्यातील कालव्यांना पुर्वी पाणी होते, त्यामुळे विहिरी व तलाव पाण्याने भरत असत. परंतु आता कालवे कोरडे पडले आहेत. त्यामुळे विहिरी, तलावही दिसत नाहीत. वाढत्या नागरिकरणामुळे रोहा शहरातील विहिरी लोप पावत आहेत. तालुक्यात कुंडलिका नदी हा पाण्याचा सर्वात मोठा स्त्रोत आहे. मात्र ही नदी सांडपाण्यामुळे दुषित झाली आहे. यावर लोकप्रतिनिधी व शासन बोलण्यास तयार नाही. या स्त्रोतांचे योग्य नियोजन केले असते तर पाण्यासाठी मोर्चे निघाले नसते. रोहा तालुक्यातील पडम ते दापोली या गावांना उन्हाळ्यात सर्वात जास्त पाणीटंचाई भासते. तेथील ग्रामस्थांना तात्पुरते पर्याय नको तर पाणीपुरवठ्याची कायमस्वरुपी उपाययोजना हवी आहे.

तालुक्यातील पाण्याच्या स्त्रोतांचा अभ्यास करून स्थानिक लोकप्रतिनिधी आणि शासन प्रतिनिधींनी तज्ज्ञांच्या सहकार्याने पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्याची आवश्यकता आहे.


(छाया : महादेव सरसंबे)

# आमदार रविशेठ पाटील यांचा विकासकामांचा धडाका

## नागोठणे विभागातील विविध कामांचे येत्या रविवारी लोकार्पण

**नागोठणे : प्रतिनिधी**

कार्यसम्राट आमदार रविशेठ पाटील यांनी नागोठणे विभागात विकासकामांचा धडाका सुरू ठेवला आहे. त्यांच्या आमदार निधीतून नागोठणे विभागात केलेल्या विविध विकासकामांचा लोकार्पण सोहळा रविवारी (दि. ५) सकाळी पळस गावातील ग्रामदैवत पळसाई मातेचे दर्शन घेऊन होणार आहे.

नागोठणे परिसरातील पळस येथील अंतर्गत रस्ता, वाघळी येथील अंतर्गत रस्ता, निडी येथील समाज मंदिर, वासगाव धनगरवाडीतील अंतर्गत रस्ता, चिकणी येथील अंगणवाडी, पाटणसई येथील अंतर्गत रस्ता, हेदवली येथील अंतर्गत रस्ता, बाळसई येथील अंतर्गत रस्ता, वरवठणे अंतर्गत रस्ता, पिंगोडे शाळा ते आंबेघर रस्ता काँक्रिटीकरण, आंबेघर अंतर्गत रस्त्याचे काँक्रिटीकरण, वेलशेत अंतर्गत रस्त्याचे काँक्रिटीकरण, वेलशेत येथील व्यायामशाळा आदी विकासकामे आमदार रविशेठ पाटील यांच्या आमदार निधीतून पुर्ण झाली आहेत. त्यांचे लोकार्पण रविवारी आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

या सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन भाजप नागोठणे शहराध्यक्ष सचिन मोदी तसेच संतोष लाड यांनी केली आहे.

# कशेळे ग्रामीण रुग्णालयाला अखेर मिळाले वैद्यकीय अधिकारी

## मानवी हक्क आयोगाकडे याचिकेनंतर सरकारकडून नियुक्त्या

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील कशेळे ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे अनेक वर्षे रिक्त होती. त्यासाठी आदिवासी ठाकूर समाज सेवा या संघटनेचे राज्य अध्यक्ष मनोहर पादीर यांनी थेट मानवी हक्क आयोगाकडे याचिका दाखल केली होती. दरम्यान, राज्य सरकारच्या आरोग्य विभागाने कशेळे ग्रामीण रुग्णालयातील अनेक वर्षे रिक्त असलेल्या पदांवर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या आहेत.


(छाया : संतोष पेरणे)

कशेळे ग्रामीण रुग्णालयात प्रसुती, स्त्रीरोग तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ, भूल तज्ज्ञ तसेच फिजिशियन सर्जन आणि वैद्यकीय अधीक्षक ही पदे वर्षानुवर्षे रिक्त आहेत. त्यामुळे स्थानिक आदिवासी लोकांना आरोग्य सेवा मिळत नाही. या ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे भरावीत तसेच या रुग्णालयात ब्लडबँक, सोनोग्राफी मशीन, एमआरआय मशीन आदी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, यासाठी मनोहर पादीर यांनी राज्य मानवी हक्क आयोगाकडे याचिका दाखल केली होती. या याचिकेवर मानवी हक्क आयोगाच्या न्यायालयात सुनावणी झाली. त्यानंतर राज्य शासनाने कशेळे ग्रामीण रुग्णालयातील दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे तात्काळ भरली आहेत. तर पुढील आठ दिवसात या ग्रामीण रुग्णालयात सर्व उपचार होतील, असे आश्वासन दिले.

दरम्यान, कशेळे ग्रामीण रुग्णालयात स्त्री रोगतज्ज्ञ म्हणून डॉ. पाटील या आणि बालरोग तज्ज्ञ म्हणून डॉ. प्रतीक झेंडे यांनी कामकाजाला सुरुवात केली असल्याची माहिती याचिकाकर्ते मनोहर पादीर यांनी दिली.

# दस्तुरी नाका परिसरात घोड्यांची लीद

## माथेरान नगरपालिकेने केली रस्तासफाई

**कर्जत : बातमीदार**

दस्तुरीनाका वाहनतळ ते मालधक्का हा रस्ता घोड्यांच्या लिदी (विष्टा)ने भरून गेला होता. त्याबाबत माथेरान नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे तक्रार आल्यानंतर सुमारे २०० मीटर लांबीच्या या रस्त्याची कर्मचारी लावून साफसफाई करण्यात आली. आता हा रस्ता लिदमुक्त झाला आहे.



माथेरानमध्ये सुरु असलेल्या विकासकामांसाठी लागणारे साहित्य वाहून नेण्यासाठी घोड्यांचा वापर केला जातो. हे सर्व बाधकाम साहित्य दस्तुरीनाका येथून घोड्यांच्या पाठीवर टाकून माथेरानमध्ये आणावे लागते. ४००हुन अधिक घोड्यांच्या वर्दळीमुळे दस्तुरीनाका वाहनतळ ते मालधक्का हा रस्ता घोड्यांच्या लिदीने भरून गेला होता.

पर्यटक आणि स्थानिकांच्या आरोग्यास रस्त्यावर पडलेली लीद अपायकारक आहे. तसेच ही लीद पावसाच्या पाण्यासोबत जंगलात आणि दरीत वाहून जाऊन झाडांना धोका पोहचू शकतो. त्यामुळे रस्त्यावर पडलेली घोड्यांची लीद उचलण्यात यावी, अशी मागणी काही पर्यटक आणि निसर्गप्रेमी यांनी माथेरान नगर परिषदेकडे केली होती.

माथेरान नगर परिषदेच्या मुख्याधिकारी आणि प्रशासक सुरेखा भणगे यांनी १ आणि २ जून रोजी आरोग्य विभागाचे कंत्राटी कर्मचारी लावून दस्तुरीनाका वाहनतळ ते मालधक्का या भागातील रस्त्यावर पडलेली सुमारे दोन टन लीद उचलण्याचे काम केले. त्यानंतर त्या भागात व्यवसाय करणाऱ्या घोडे मालकांनी घोड्यांची लीद स्वतः गोळा करावी आणि अन्यत्र नेवून टाकावी अशी सूचना मुख्याधिकारी भणगे यांनी केली आहे.दरम्यान, नगरपालिकेच्या या भूमिकेचे माथेरान संयुक्त वन व्यवस्थापन समितीने स्वागत केले आहे.

# मुरूडमध्ये नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन सभा

**मुरूड : प्रतिनिधी**

पावसाळ्यातील पूर, वादळ, वीज पडणे, अतिवृष्टी यासह विविध प्रकारच्या नैसर्गिक आपत्तींशी मुकाबला करण्यासाठी व्यवस्थापन आवश्यकच आहे. त्यासाठी विविध यंत्रणा सज्ज करा, अशा सूचना मुरूड तहसीलदार रोहन शिंदे यांनी संबंधीत यंत्रणांना दिल्या.


(छाया : संजय करडे)

मुरूड तहसील कार्यालयात तहसीलदार रोहन शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनाची सभा झाली, त्यावेळी तहसीलदार शिंदे उपस्थितांना मार्गदर्शन करीत होते. मुरूडचे पोलीस निरीक्षक नितिन गवारे, नायब तहसीलदार गोविंद कोटंबे, गटविकास अधिकारी सुभाष वाणी, नगर परिषद लिपिक मनोज पुलेकर, सहाय्यक बंदर निरीक्षक यशोधन कुलकर्णी, बांधकाम उपअभियंता आर. आर. गोरे, कोस्टगार्डचे अधिकारी अमोल शिंदे, वैद्यकीय अधिकारी डॉ. अमित मेटे, मत्स्यव्यवसाय परवाना अधिकारी अ. का. कदम, एसटी आगार व्यवस्थापक सुनील वाकचौरे, सहाय्यक बंदर निरीक्षक देवदास पोटे, वनविभाग अधिकारी ए. एस. सहारे आदिसह अधिकारी, कर्मचारी या सभेला उपस्थित होते.

मुरूड तालुक्यातील नियंत्रण कक्ष २४ तास चालू असून कोणत्याही स्वरूपाची आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास त्वरीत मुरूड तहसील कार्यालय (०२१४४-२७४०२६), नगर परिषद कार्यालय (०२१४४-२७४०२२), मुरूड पोलीस ठाणे (०२१४४-२७४०३३), रेवदंडा पोलीस ठाणे (०२१४१-२४००३३) येथील नियंत्रण कक्षाशी त्वरीत संपर्क करावा, असे आवाहन तहसीलदार शिंदे यांनी या वेळी केले.

# शहीद राकेश सावंत यांचा सोमवारी तेरावा स्मृतीदिन

## रस्त्याच्या आश्वासनाची अद्यापही पूर्तता नाही


(संग्रहित छायाचित्र)

**पोलादपूर : प्रतिनिधी**

शहरातील अमरनगर येथील शहीद राकेश तात्याबा सावंत यांचा तेरावा स्मृतीदिन येत्या सोमवारी (दि. ६) आहे, मात्र शहीद सावंत यांच्या घरापर्यंतचा रस्ता करून देण्याचे प्रशासनाने दिलेले आश्वासन अद्याप अपूर्णच आहे.

पोलादपूर शहरातील शहीद राकेश सावंत यांना देशसेवेदरम्यान आलेल्या वीरमरणानंतर तत्कालीन आमदार स्व. माणिकराव जगताप, तत्कालीन जि.प.सदस्य व विद्यमान आमदार भरत गोगावले तसेच माजी मंत्री स्व. प्रभाकर मोरे आदींनी शहीद कुटुंबीयांच्या घरापर्यंत रस्ता करण्याची ग्वाही देऊन प्रशासनाला तसे आदेश दिले होते, मात्र तेव्हापासून आजतागायत या संदर्भात कोणतीही कार्यवाही न झाल्याने वीरपिता तात्याबा सावंत आणि कुटूंबियांमध्ये तीव्र नाराजी दिसून येत आहे.

दरम्यान, सोमवारी सकाळी मूर्तिपूजन झाल्यानंतर तुर्भे येथील हभप हरिभाऊ शिंदे महाराजांची कीर्तनसेवा होणार आहे. त्यानंतर दुपारी श्रद्धांजलीचा कार्यक्रम होणार असल्याची माहिती माहिती वीरपिता तात्याबा सावंत आणि वीरमाता जयश्री सावंत यांनी दिली.

# रायगडात शेतकरी लागले कामाला; नांगरणीला सुरुवात

**अलिबाग : प्रतिनिधी**

पावसाळा जवळ आल्यामुळे रायगड जिल्ह्यात शेतकऱ्यांनी शेतीच्या कामास सुरुवात केली आहे. सध्या धूळपेरणी सुरू आहे.

मान्सूनचे आगमन झाले नसले तरी मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या मान्सूनपूर्व सरींमुळे शेतीसाठी पूरक वातावरण तयार झाले आहे. जूनच्या सुरुवातीला धूळवाफ्यावर भाताची पेरणी करण्यात आली होती. ही रोपे आता उगवून वर आली आहेत. सध्या अधूनमधून पडणारा पाऊस या रोपांसाठी पुरेसा ठरतोय. त्यामुळे शेतकऱ्यांनी नांगरणीच्या कामाला सुरुवात केली आहे. दक्षिण रायगडातील महाड, पोलादपूर, माणगाव, रोहा, श्रीवर्धन या तालुक्यांमध्ये शेती मशागतीच्या कामांना वेग आला आहे. जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी भात रोपवाटिका तयार करण्याकरिता पेरणी झालेली आहे.

रोपवाटिकेमधील तणांच्या बंदोबस्तासाठी पेरणीनंतर वाफे ओले होताच प्रति लिटर पाण्यात ऑक्सीदियाराझिल तीन मिली याप्रमाणे पाच लिटर एक आर क्षेत्रावर समप्रमाणात फवारावे. तणांचे प्रभावी नियंत्रण करून जोमदार भात रोपे तयार करण्यासाठी भात रोपवाटिकेत प्रतिहेक्टर १ टन गिरीपुष्पाचा पाला भात रोपाटिकेमध्ये मोकळ्या जागेत पसरावा आणि शिफारशीप्रमाणे खते द्यावीत. पेरणीनंतर १५ दिवसांनी १ हेक्टर क्षेत्राकरिता एक किलो युरियाचा दुसरा डोस द्यावा. असे आवाहन कृषी विभागातर्फे करण्यात आले आहे.








पनवेल महानगरपालिका






















Ramsheth Thakur International Sports Complex
RTISC
जागतिक पर्यावरण दिन तसेच
आदरणीय लोकनेते
श्री. रामशेठ ठाकूर साहेब
यांच्या ७१ व्या वाढदिवसा निमित्त
उलवे २०२२
सायक्लोथॉन
चला सायकल चालवू निसर्ग हिरवा ठेवू...
ULWE SENA
For the Race category
Men's/Women's
25 kms
1st Prize - Rs.20,000/-
2nd Prize- Rs.10,000/-
3rd Prize- Rs.5,000/-
4th Prize- Rs.3,000/-
5th Prize- Rs.2,000/-
Consolation Prizes
Rs.1,000/-
each for next 5 winners
Contact
9029065533
9820198381
SUNDAY, 05TH JUNE 2022 TIME 06.00 AM ONWARDS
CATEGORY 3 KMS 10KMS 15KMS 25KMS
Organized By :
Ramsheth Thakur International Sports Complex
Ulwe Sena Samajik Sanstha & Cycling Club of India
Registration Link
https://t.ly/lVGo
Venue : Plot No. 1 & 2, Sector 16A,
Ulwe Node, Navi Mumbai - 410 206.